रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक २११ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, रविवार, दि. २९ डिसेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

# रायगड हाऊसफुल्ल

| अलिबाग | वार्ताहर |

नाताळची सुट्टी, थर्टी फर्स्ट आणि नववर्षाचे सेलिब्रेशन यामुळे मुंबई-पुण्यापासून जवळचं पर्यटनस्थळ असलेले रायगडचे किनारे पर्यटकांनी अक्षरशः फुलून गेले आहेत. मौज-मस्ती आणि सोबतीला साग्रसंगीताची मजा अनुभवण्यासाठी समुद्रकिनाऱ्यांना अधिकची पसंती दिली जात आहे, त्यामुळेच रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारी असणारी शहरे आणि गावे पर्यटकांच्या गर्दीमध्ये चांगलीच गजबजून गेली आहेत. येथील विविध हॉटेल्स, रेस्टॉरंट, रिसॉर्ट आणि कॉटेजेस हाऊसफुल्ल झाली आहेत.

## नववर्षाच्या स्वागतासाठी लाखो पर्यटक दाखल; किनारे गजबजले

बुधवारी नववर्षाच्या सेलिब्रेशनसाठी शनिवार आणि रविवारीच पर्यटक दाखल झाल्याने न्यू इयर पार्ट्यांना चांगलीच रंगत येणार असल्याचे दिसून येते. सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटकांनी रायगड जिल्ह्यातील अलिबाग, वरसोली, मांडवा, किहीम, आक्षी, नागाव, काशीद, मुरुड, श्रीवर्धन, दिवेआगर, माथेरान अशा विविध ठिकाणच्या पर्यटनस्थळांवर मोठी गर्दी केली आहे. नवीन वर्षाच्या मध्यरात्री ठाणे-बेलापूर रोड, सायन-पनवेल महामार्ग, पामबीच रोडवर चक्काजाम होत असते.

पान २ वर

> महिनाभर आधीच पर्यटकांनी रुम्सची बुकिंग केली आहे. चांगल्या वातावरणामुळे पर्यटकांचा ओढा अलिबागकडे अधिक आहे. त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांनाही सुगीचे दिवस आले आहेत. येणाऱ्या पर्यटकांची चांगली बडदास्त राखली जावी यावर अधिक भर देण्यात येईल.
> – अभिजीत वाळंत, कॉटेज व्यावसायिक, नागाव-आक्षी

### मनोरंजनाची साधने

अलिबाग तालुक्यातील समुद्रकिनारे सध्या पर्यटकांनी फुलले आहेत. त्यांच्या दिमतीला पॅरासिलिंग, बनाना राइड, जेटस्की, स्पीड बोट, घोडे-उंट याची सफर अशा विविध मनोरंजनाची साधने तैनात करण्यात आली आहेत. समुद्रकिनारी समुद्र सफरीचा आनंद लुटणाऱ्या पर्यटकांसाठी सक्तीने लाइफ जॅकेट संबंधित व्यावसायिकाने पुरवणे जिल्हा प्रशासनाने बंधनकारक केले आहे, त्यामुळे लाइफ जॅकेट घातल्याशिवाय पर्यटकांना बोटीतून फिरता येणार नाही. काही दिवसांपूर्वी झालेल्या बोट दुर्घटनेमुळे प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे. म्हणूनच प्रशासनाने याबाबत मेरीटाइम बोर्डाला तसे सक्त आदेश दिले आहेत.



• (छायाचित्र : समीर मालोदे)

# डॉ. मनमोहन सिंग अनंतात विलीन



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

'अमर रहे..., अमर रहे..., मनमोहन सिंग अमर रहे...'च्या घोषणांनी जागतिक दर्जाचे अर्थतज्ज्ञ आणि देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना अखेरचा निरोप देण्यात आला. त्यांच्या पार्थिवावर दिल्लीतील निगम बोध घाटावर शनिवारी दुपारी १ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांना २१ तोफांची सलामी देण्यात आली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी, खासदार प्रियांका गांधी यांच्यासह दिग्गज नेते डॉ. मनमोहन सिंग यांच्या अंत्यविधीला उपस्थित होते. भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक आणि मॉरिशसचे परराष्ट्र मंत्री मनीष गोबिन हेदेखील निगम बोध घाटावर मनमोहन सिंग यांना अखेरचा निरोप देण्यासाठी उपस्थित होते.

देशाचे १४ वे पंतप्रधान डॉ. सिंग यांचे गुरुवारी रात्री एम्स रुग्णालयात निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. त्यांचे पार्थिव शुक्रवारी दिल्लीतील मोतीलाल नेहरू मार्गावरील त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात आले होते. या ठिकाणी अनेक राजकीय नेत्यांनी त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले होते. यानंतर डॉ. सिंग यांचे पार्थिव दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात शनिवारी सकाळी साडेनऊ वाजता नेण्यात आले. काँग्रेस मुख्यालयापासून अंत्ययात्रा काढण्यात आली. त्यानंतर निगम बोध घाटावर शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### सर्वांना अश्रू अनावर

डॉ. मनमोहन सिंग यांच्या अंत्यसंस्कारावेळी एका विशिष्ट प्रोटोकॉलचेही पालन करण्यात आले. डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर राष्ट्रध्वज तिरंगा ठेवण्यात आला होता. त्यासोबतच अंत्यसंस्काराच्या वेळी त्यांना २१ तोफांची सलामी देण्यात आली. यानंतर या ठिकाणी उपस्थितीत असलेल्या सर्व राजकीय नेत्यांनी अभिवादन केले. यानंतर शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडले. यावेळी उपस्थितीत असलेल्या सर्वांना अश्रू अनावर झाले.

## वेधक

### अपघातात एकाचा दुर्दैवी मृत्यू

**माणगाव :** मुंबई-गोवा महामार्गावर अपघाताची मालिका सुरुच आहे. शनिवारी (दि. २८) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास इंदापूरनजीक वावे दिवाळी येथे दुचाकीला इनोव्हा कारची धडक लागून एकाचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार वृत्त असे की, भारत सरकार लिहिलेली इनोव्हा कार व दुचाकी यांच्यामध्ये भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये इनोव्हा कारने दुचाकीस्वाराला मागून धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. रोहा तालुक्यातील महादेव वाडी येथील राजाराम अनंत धारदेवकर (६४) हे टीव्हीएस ज्युपिटर पान २ वर

### '...तर महिलांवरील चिखलफेक थांबेल'

**मुंबई :** आष्टी तालुक्याचे आमदार सुरेश धस यांचा तीव्र निषेध व्यक्त करण्यासाठी मी पत्रकार परिषदेचे आयोजन केले आहे. महिलांवर फक्त चिकलफेख केली जाते. सांस्कृतिक कार्यक्रमात सत्कार स्वीकारताना आमदार धनंजय मुंडे यांचा फोटो आणि मी धन्यवाद म्हटले, यावरून माझ्याविरुद्ध आवई उठवली जाते. लोकप्रतिनिधी टिप्पणी करतात. मी म्हणते तुमच्या राजकारणात कलाकारांना मध्ये का खेचता? सामान्य कुटुंबातून आलेल्या मुली सिने क्षेत्रात येतात. संघर्ष करतात. प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. मात्र, तुम्ही महिला कलाकारांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवता, असा उद्वेग अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी मुंबईत पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. पान २ वर

## पाच मुलांना विषबाधा

### उघड्यावरील अन्न खाल्ल्याने बाधित

| उरण | वार्ताहर |





दिघोडे बसस्थानकाजवळील उघड्यावर विकला जाणारा सुरमा हा खाद्यपदार्थ मुलांनी खाल्ल्याने पाच जणांना विषबाधा झाल्याची घटना शनिवारी (दि. २९) घडली आहे. त्यामुळे सदर मुलांच्या पोटात दुखायला लागले व उलट्या होऊ लागल्याने त्यांना तातडीने चिरनेर गावातील रवि क्लिनिक या रुग्णालयात दाखल करण्यात आले असता रुग्णालयातील डॉ. प्रकाश मेहता यांनी बाधित मुलांवर उपचार सुरू केले. ही विषबाधा ही शोरमा हा खाद्यपदार्थ खाल्ल्याने झाल्याची माहिती सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

अन्न व औषध प्रशासनाने पैशाच्या हव्यासापोटी उरण तालुक्याकडे दुर्लक्ष केल्याने आज शहरात व तालुक्यातील अनेक गावांतील नाक्यांवर राजरोसपणे उघड्यावरील खाद्यपदार्थ परप्रांतीय नागरिक विक्री करत आहेत. त्यामुळे उघड्यावरील अन्न खाल्ल्याने अनेकांना उलट्या, पोटात दुखण्याची कारणे समोर येत आहेत. त्यातच शनिवारी (दि.२९) दिघोडे बसस्थानकाजवळील रस्त्यावर विकला पान २ वर

> बाधित मुलांनी उघड्यावरील सुरमा हा अन्न पदार्थ खाल्ल्याने त्यांना अन्नातून विषबाधा झाली आहे. त्यांची प्रकृती चांगली आहे. तरी नागरिकांनी विशेष करून लहान मुलांनी उघड्यावरील अन्नपदार्थ खाऊ नयेत.
> – डॉ. प्रकाश मेहता

### तळोजा औद्योगिक परिसरातील प्रदूषणात वाढ

## मच्छीची भुकटी बनवणाऱ्या कारखान्यांमुळे दुर्गंधी

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |



तळोजा औद्योगिक वसाहतीमधील काही कारखान्यांत मच्छीपासून भुकटी तयार करण्याची प्रक्रिया करण्यात येते. या प्रक्रियेदरम्यान सडलेल्या मच्छीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असून, औद्योगिक क्षेत्र परिसरातील वसाहतीमधील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

तळोजा औद्योगिक वसाहत आणि प्रदूषण हे वर्षानुवर्षीचं समीकरण सोडवण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासोबत अनेक सामाजिक संस्था तसेच राजकीय पुढारी काम करत आहेत. येणाऱ्या तक्रारिंची दखल घेत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडूनदेखील प्रदूषणास जबाबदार कारखान्यांविरोधात वेळोवेळी कारवाई करण्यात येत असते. मात्र, असे असतानाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्रदूषणास जबाबदार उद्योगांना कारखाने सुरु करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येत असल्याने एमपीसीबीचा नाईलाज होत आहे. पान २ वर

### एमआयडीसीला तपासणीचा विसर?

औद्योगिक वसाहतीत कोणत्या प्रकारचे कारखाने याची परवानगी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ देते. ही परवानगी देताना संबंधित कारखाना प्रदूषणात भर घालतंय का, हेदेखील एमआयडीसीने तपासणे गरजेचे आहे. जेणे करून प्रदूषणाच्या तक्रारीत कमी येईल, असे मत पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## अभिनेत्री उर्मिला कोठारेच्या कारने दोघांना चिरडलं

### एकाचा मृत्यू

| मुंबई | प्रतिनिधी |

शूटिंग संपवून घरी परतत असताना अभिनेत्री उर्मिला कोठारेच्या गाडीला भीषण अपघात झाला आहे. कारने दोन मुजरांना उडवलं आहे. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला असून, एक गंभीर जखमी आहे. मुंबईतील कांदिवली परिसरातील पोईसर मेट्रो स्टेशनजवळ शुक्रवारी (दि. २७) हा भीषण अपघात झाला.

याप्रकरणी समता नगर पोलीस ठाण्यात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघात झाल्यावर गाडीतील एअर बॅग्ज वेळीच उघडल्याने उर्मिलाचा जीव वाचला. तिच्या गाडीचं नुकसान झालं आहे.






## तळीरामांनो, सावधान!

| पेण | प्रतिनिधी |

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कर्जत, माथेरान, महाबळेश्वर, अलिबाग या ठिकाणातील फार्म हाऊस खिशाला परवडत नसल्याने अनेक आंबट शौकिनांची पेण येथील फार्म हाऊसकडे येण्याची संख्या गेल्या दोन वर्षांत वाढली आहेत. त्यातच नाताळपासून ३१ डिसेंबरपर्यंत या फार्म हाऊसवर हाऊसफुल्ल गर्दी असते. या पार्श्वभूमीवर पेण तालुक्यातील पूर्व भागातील व पाबळ खोऱ्यातील फार्म हाऊसवर अवैधरित्या दारू, गांजा, चरस, असे आंबट शौकिनांची नशा वाढवणाऱ्या पदार्थांची रेलचेल वाढत असल्याचा संशय खाकीला आल्याने पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. त्यातच परवाना नसताना अनधिकृत ढाबे, चायनिज सेंटर, हॉटेल यामध्येदेखील खुलेआम मद्यविक्री केली जात असल्याची चर्चा असून, यावरही उत्पादन शुल्क विभागाची बारीक नजर राहणार आहे. पान २ वर



### थर्टी फर्स्टच्या पार्टीवर खाकीची करडी नजर



### खरंच कारवाई होणार?

खाकीचा विशेष दस्त तयार झाला असून, या दस्ताच्या माध्यमातून या फार्म हाऊस मालकांवर व बड्या बापांच्या धेंड्यांवर तसेच आंबट शौकिनांवर कायदेशीर कारवाई होणार यात काही शंका नाही. त्यामुळे जिल्ह्यातील खाकी आता अलर्ट मोडवर असल्याने थर्टी फर्स्टच्या नावाने होत असणारा नंगा नाच थांबणार असेच काहीसे चित्र दिसत आहे. परंतु, हे चित्र थांबणार की वाढणार, हा येणारा काळच ठरवेल.

### संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ

## बीडमध्ये मूक मोर्चा

### धनंजय मुंडेंची हकालपट्टी करा, आंदोलकांची मागणी

| बीड | प्रतिनिधी |

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ बीडमध्ये शनिवारी (दि. २८) सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्यात आला. हा मूक मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालवयावर धकडला. या मूक मोर्चातून सर्वपक्षीय नेत्यांनी आणि आंदोलकांनी आपला आक्रोश व्यक्त केला. धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा आणि वाल्मिक कराडला अटक करा, अशी जोरदार मागणी आंदोलकांनी केली.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाला आज १९ दिवस पूर्ण झाले आहेत. तरीही यातील संशयित मुख्य पान २ वर



## कृषीवलच्या दणक्याने खांडाकरांना शुद्ध पाणी

### नाल्यातील दूषित पाणी जलवाहिनीमधून जात होते घरोघरी

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ ग्रामपंचायतीकडून देण्यात येणाऱ्या पाण्यात जिवंत अळ्या आणि दूषित पाणी येत होते. त्यानंतर स्थानिक ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा करण्याचा इशारा दिला होता. याबाबत कृषीवलने आवाज उठवला होता. त्यानंतर प्रशासनाने खडबडून जागे होत तात्काळ उपाययोजना केली. त्यामुळे आता खांडा ग्रामस्थांना शुद्ध पाण्याचा पुरवठा होऊ लागला आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी कृषीवलचे आभार मानले आहेत.

दरम्यान, नेरळ ग्रा.पं.कडून सर्व जलवाहिनी उघडून पाहिल्यानंतर नाल्यातील दूषित पाणी जलवाहिनीमध्ये जात असल्याने दूषित पाण्याचा पुरवठा होत होता. सर्व अडचणी दूर करण्यात आल्यानंतर खांडा गावातील ग्रामस्थांना शुद्ध पाण्याचा पुरवठा होऊ लागला आहे. पान २ वर


खांडामध्ये नळावाटे
दूषित पाणी
■ पाण्यातून येताहेत अळ्या
■ नागरिकांचे आरोग्य धोक्यात
आरोग्य विभागाने घेतली दखल

> आम्ही गावातील अनेक समस्या मार्गी लावण्याचा प्रयत्न करीत आहोत. खांडा गावात अशुद्ध दूषित पाणी नळाद्वारे जात असल्याची तक्रार प्राप्त झाल्यावर पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सर्व जलवाहिन्या खोलून समस्येचे मूळ शोधण्याचे काम केले आहे. त्यांनतर प्रत्येकाला स्वच्छ पाणी मिळू लागले आहे. बहुसंख्य जलवाहिन्या या जुन्या झाल्या आहेत. त्या बदलण्याची सूचना आम्ही सर्व ग्रामस्थांना करीत आहोत. – सुजित धनगर, प्रशासक

### नवी मुंबई विमानतळाची धावपट्टी सज्ज

## आज होणार पहिल्या विमानाचे लँडिंग

| उरण | वार्ताहर |

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. काही दिवसांपूर्वी या विमानतळावर वायुदलाचे सी २९५ आणि सुखोई ३० या विमानांच्या यशस्वी लँडिंगनंतर आता रविवारी (दि. २९) पहिल्या व्यावसायिक विमानाचे लँडिंग होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

विमान सुरक्षा प्राधिकरणाचे परीक्षण अधिकाऱ्यांसह दिल्लीहून पहिले विमान लँडिंग रविवारी होणार आहे. त्यानंतर परीक्षण अधिकाऱ्यांचे पथक मुंबईतून उडणाऱ्या इंडिगो एअरलाईन्सच्या प्रवासी वाहतूक विमानातून प्रवास करत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरेल.




२९ डिसेंबर रोजी व्यावसायिक विमानांच्या उड्डाणांची चाचणी पार पडेल. तर, एप्रिल २०२५ पासून विमानतळावरील पहिली धावपट्टी सुरू होईल. नवीन वर्षात पहिली धावपट्टी सुरू करण्यात येणार आहे आणि त्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. मार्च २०२५ मध्ये हे विमानतळ नियमित प्रवासी सेवेसाठी सुरू होणार आहे.




नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन दरवर्षी ९ कोटी प्रवासी वाहतूक होईल. म्हणूनच मोठ्या शहारासाठी हा प्रकल्प लोकांना दिलासा देणारा आहे. याची क्षमता वाढविण्यासाठी परवानगीची कामे युद्धपातळीवर सुरु आहेत. पहिल्या टप्प्यात चार टर्मिनल असून, ४२ विमाने उभी राहतील. ५५०० क्षमतेचे कार पार्किंग असेल. हे विमानतळ ११.०४ किलोमीटर परिसरात उभे राहात असून, दोन धावपट्ट्या असतील.

मुंबई विमानतळाची सध्या ४८ दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष इतकी क्षमता असून, वर्ष २०३० पर्यंत मुंबई महानगर प्रदेशातील अपेक्षित असलेल्या १०० दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष हवाई प्रवास मागणीची पूर्तता करण्यासाठी नागरी विमान चालन मंत्रालयाने नवी मुंबईमध्ये ग्रीनफिल्ड विमानतळ विकसित करण्यासाठी मंजुरी दिलेली आहे. विमानतळ पूर्ण झाल्यानंतर कुशल आणि बिगर कुशल कामगारांसाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. लॉजिस्टिक्स, किमती वस्तू उत्पादन, बीपीओ इत्यादी क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मिती होईल.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# उड्डाणपुलाविरोधात ग्रामस्थ आक्रमक

## ■ १० जानेवारीला बेमुदत उपोषणाचा इशारा



**। कोलाड । वार्ताहर ।**

**मुंबई-गोवा महामार्गावरील आंबेवाडी नाक्यावर सध्या उड्डाणपुलाचे काम सुरु असून, त्याबाबत ग्रामस्थांना विश्वासात घेण्यात आलेले नाही, असा त्यांचा आरोप आहे. संबंधित ठेकेदाराला ग्रामस्थांचे काहीही घेणे देणे लागले नाही, असे दिसून येत आहे.**

यामुळे आंबेवाडी नाक्यावरील उड्डाण पुलाविषयी ठरल्याप्रमाणे येत्या १० जानेवारी २०२५ रोजी उपोषणाला बसणार असणार असल्याचे येथील सामाजिक कार्यकर्ते भरत सतांबेकर यांनी सांगितले आहे. या आंदोलनाला ग्रामस्थांनी पाठिंबा दिला आहे.

यावेळी भरत सतांबेकर, लाला शिंदे, जगदीश प्रभू, कुमार लोखंडे, प्रदीप एकबोटे, बाबू हळदे, प्रचित तेलंगे, दिपक सातांबेकर, असंख्य रिक्षा व मिनिडोअर चालक उपस्थित होते. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील आंबेवाडी बाजारपेठेतील उड्डाण पुलाचे काम सुरु असून, ते फक्त दोन ते तीन पिलरवर होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. ते पूल ग्रामस्थांना विश्वासात घेऊन करावे याविषयी लोकप्रतिनिधीना निवेदन देण्यात आले असून, याविषयी येत्या १० तारखेपर्यंत कोणताही निर्माण मिळाला नाही तर अमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते भरत सातांबेकर, व्यापारी वर्ग व ग्रामस्थ यांच्याकडून देण्यात आला आहे.

> **मुंबई-गोवा महामार्गाचे काम अनेक वर्षांपासून रखडले आहे. ते कसे करतात हे ग्रामस्थांना माहिती नाही. तसेच ग्रामस्थांच्या असंख्य असणाऱ्या मागण्या पूर्ण करा अन्यथा भरत सातांबेकर यांना पाठिंबा देऊन जनआक्रोश आंदोलन करू.**
> **- लाला शिंदे, सामाजिक कार्यकर्ते**

> **ग्रामस्थांना विश्वासात घेऊन या पुलाचे पिलर हे अंबर सावंत मंदिरापर्यंत बांधावेत यामुळे पूर्वेकडील ग्रामस्थांना प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी येथे जाण्यासाठी वळसा घालावे लागणार नाही. परंतु मी दिलेल्या निवेदनाची शासनाने दखल येत्या १० जानेवारीपर्यंत न घेतल्यास अमरण उपोषला बसणार आहे.**
> **- भरत सातांबेकर, सामाजिक कार्यकर्ते**

> **गेली दहा वर्षांपासून आंबेवाडी बाजारपेठेतील व्यापारी वर्ग,समस्त ग्रामस्थ तसेच समस्त माता भगिनी यांनी हा पूल पनवेलच्या धर्तीवर व्हावा यासाठी लोकप्रतिनिधीना निवेदन देण्यात आले. परंतु आमच्या माहितीनुसार हा उड्डाण पूल दोन ते तीन पिलरवर होत आहे असे न होता तो पनवेलसारखा व्हावा नाहीतर आम्ही आंदोलन करू.**
> **- जगदीश प्रभू, व्यापारी**

# महिलांना स्वसंरक्षणासाठी स्वयंसिद्धाचे प्रशिक्षण

## ■ उसर येथील गेल इंडिया लिमिटेडचा पुढाकार



**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील उसर गावातील महिला व मुलींसाठी गेल इंडिया लिमिटेड, उसर यांच्या पुढाकाराने पाच दिवसीय मोफत स्वसंरक्षण स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, त्याचा प्रारंभ करण्यात आला.

या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन मुख्य महाप्रबंधक पीडीएचपीपी प्रोजेक्ट गेल उसरचे अनुप गुप्ता, जितिन सक्सेना- महाप्रबंधक, शितल लाकरा- मुख्य प्रबंधक यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, अश्विनी दिनेश शिंदे- पोलीस पाटील उसर, शशिकला धसाडे- पोलीस पाटील, कुणे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी, अर्चनाशिंदे अध्यक्षा आई एकविरा महिला बचत गट,उसर, मिताली शिंदे- आई एकविरा महिला बचत गट उसर, प्रियांका शैलेंद्र शिंदे -उपाध्यक्ष, ग्रामस्थ अस्मिता शिंदे, प्रणाली दमामे, तन्वी शिंदे, विजया शिंदे, प्रशिक्षिका निकी बेंडे, प्रणाली तळेगावकर, हर्षाली नागावकर, वेदिका लाडगे व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

अश्विनी दिनेश शिंदे यांनी उपस्थित महिला व मुलींना शुभेच्छा देत स्वसंरक्षणाचे महत्त्व सांगितले व प्रिझम सामाजिक विकास संस्थेस शुभेच्छा दिल्या. शशिकला धासाडे यांनी स्वसंरक्षणाचे फायदे याविषयी सांगितले, तर तपस्वी गोंधळी यांनी या पाच दिवसांच्या स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिरामध्ये कशाप्रकारे प्रशिक्षण दिले जाणार आहे, याविषयी सविस्तर माहिती दिली. या प्रशिक्षणास उसर गावातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

# भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात इसम जखमी

## नगरपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष

**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरात भटक्या कुत्र्यांची पुन्हा एकदा दहशत निर्माण झाली असून भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात इसम गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की तारणे येथील लक्ष्मण पतारी हे तळा मांदाड रस्त्यावर उतरले असता त्यांच्यावर अचानक तीन ते चार कुत्र्यांनी हल्ला चढवला. अचानकपणे झालेल्या हल्ल्यामुळे लक्ष्मण पतारी हे अक्षरशः खाली कोसळले.सुदैवाने त्याच ठिकाणी असलेले सामाजिक कार्यकर्ते गुरुदास तळकर यांनी त्यांची कुत्र्यांच्या तावडीतून सुटका केली. व त्यांना तात्काळ ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.तळा बाजारपेठ परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून या भटक्या कुत्र्यांच्या टोळीने शहरात अक्षरशःउच्छाद मांडला आहे.यातील काही जण येणा-जाणाऱ्या माणसांचा व वाहनांचा भुंकत जाऊन पाठलाग करत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



लहान मुले आबालवृद्ध, वाहनचालक, दुचाकीस्वार यांच्या अंगावर धावून जखमी करण्याचे प्रकारही काही वेळा घडले आहेत.या भटक्या कुत्र्यांबाबत वारंवार कळवूनही तळा नगरपंचायत जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे.तळा नगरपंचायत प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन भटक्या कुत्र्यांबाबत कारवाई करून कायमचा बंदोबस्त करण्याची मागणी तळा वासीयांकडून करण्यात येत आहे.

# परिवहनमंत्र्यांची पनवेल बसस्थानकाला भेट

## प्रताप सरनाईक यांच्या अधिकाऱ्यांना सूचना



**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी (दि. २६) पनवेल एसटी आगाराला भेट देत एसटी आगारातील दुरवस्थेवरू परिवहन प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी करत नाराजी व्यक्त केली आहे. बसस्थानकाच्या सोयी-सुविधासाठी सुधारणा करण्याच्या सूचना यावेळी परिवहन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

आ. प्रताप सरनाईक यांना परिवहन मंत्री पद मिळाल्यानंतर गुरुवारी पनवेल, खोपोली बसस्थानक पाहणी दौरा करण्यात आला. गुरुवारी साडेआकराच्या सुमारास पनवेल बसस्थानक पाहणी दौऱ्यात प्रवाशांच्या समस्या जाणून घेतल्या. दरम्यान डेपोतील दुरवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालय, आरक्षण खिडकी, ड्रायव्हर, कंडक्टर विश्रामगृह, शालेय मुलींच्या समस्या, परिसरातील अस्वच्छता पाहून सरनाईक यांनी नाराजी व्यक्त केली. तर त्यात सुधारणा करण्यासाठी परिवहन अधिकारी यांना सूनचाही करण्यात आल्या आहेत. बसस्थानकाच्या बांधकामाविषयीदेखील चर्चा करण्यात आली. बीओटी तत्त्वावर बांधण्यात येणाऱ्या बसस्थानक इमारत त्यातील विविध भागाची माहिती घेतली. बांधकामातील नकाशाची पाहणी करत अधिकाऱ्यांना विविध सूचनाही करण्यात आल्या आहेत.

> **प्रवाशांना अधिक आरामदायी आणि सोयीस्कर प्रवास अनुभव मिळावा यासाठी डेपोमध्ये स्वच्छतागृहे, वेटिंग एरिया आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा यासह सुविधा वाढविण्यासाठी अधिकाऱ्यांना स्थायी सूचना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येकासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार्यक्षम, सुलभ आणि सोयीस्कर बनवण्यासाठी परिवहन मंत्रालय वचनबद्ध राहणार आहे.**
> **प्रताप सरनाईक, राज्य परिवहनमंत्री**

### आरटीओच्या जप्तीची वाहने हटवण्याच्या सूचना

**पनवेल बसस्थानकात आरटीओकडून खासगी वाहनावर कारवाई करत, ती वाहने पनवेल बसस्थानक आवारात उभी करण्यात आली आहेत. त्यामुळे बसस्थानकातील जागा अडवून ठेवल्याप्रकरणी सरनाईक यांनी ती वाहने हटवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली असून, वाहने काढून न घेतल्यास आरटीओ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.**

### बसस्थानक नूतनीकरणासंदर्भात मंत्रालयात बैठक

**पनवेल बसस्थानकाचे नूतनीकरणाचे काम बीओटी तत्वावर देऊनही सहा वर्ष डेपोचं काम रखडले आहे. नवीन आराखड्यानुसार पाच मजली इमारत उभारणी करण्यात येणार आहे. त्यात पहिल्या व दुस-या मजल्यावर बससाठी पार्किंग ठेवण्यात आली आहे. पहिल्या मजल्यावर बसेस कशा पध्दतीने जातील याचा आढावा घेतला. त्यात चुकीचे आढळल्याने पुढील दोन आठवड्यात या विषयी मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी परिवहन मंत्री सरनाईक बोलत होते.**

### पनवेल-खोपोली लालपरीने प्रवास

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक गुरुवारी पनवेल एसटी डेपोची पाहणी केली. त्यानंतर पनवेल बसस्थानकातून खोपोली येथील बसस्थानकास भेट देण्यासाठी लालपरीतून प्रवास केला आहे.**

## पान १ वरून

### रायगड हाऊसफुल्ल

वाहतूककोंडी टाळण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. पोलिसांनी सर्व प्रमुख रस्त्यांवर बंदोबस्त वाढविला असून, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी दि. २८ व २९ रोजी जड-अवजड वाहनांना बंदी घातली आहे. मद्यपान करून वाहने चालविणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले आहे. हॉटेल्समध्ये साध्या वेशातील पोलीसही पाळत ठेवणार असल्याचे ते म्हणाले. कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचविणाऱ्यांवर तात्काळ कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रायगडात येणाऱ्या पर्यटकांनी मद्यपानाऐवजी सहकुटुंब नवीन वर्षाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**वाहतूक पोलीस तैनात**

मुंबई, पुणे तसेच राज्यातून येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांची संख्या पाहता मुंबई-गोवा महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ वाढणार आहे. मुंबई-गोवा महामार्गावर चौपदरीकरणाचे काम अनेक ठिकाणी रखडले आहे. वडखळ ते अलिबाग, इंदापूर, माणगाव ही वाहतूककोंडीची ठिकाणे आहेत, त्यामुळे या ठिकाणांसह शहरातील गर्दीच्या ठिकाणी वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

**खवय्यांची चंगळ**

खवय्यांसाठी कोकणी, गोमंतक, आगरी, कोळी अशा पदार्थांची मेजवानी दिली जाणार आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विविध हॉटेल, रेस्टारंटच्या व्यवस्थापनाने डिजे नाइट पार्टीचे आयोजन केले आहे. यासाठी विविध पॅकेजच त्यांनी पर्यटकांना देऊ केली आहेत. त्यामध्ये खाणे-पिणे, नाचगाणी यांचा समावेश आहे.

### मच्छीची भुकटी बनवणाऱ्या कारखान्यांमुळे दुर्गंधी

खतनिर्मितीसह माशांचे खाद्य म्हणून वापर

सद्यःस्थितीत तळोजा औद्योगिक वसाहतीत मच्छीपासून भुकटी तयार करणारे तीन कारखाने सुरु आहेत. या ठिकाणी अत्यंत गलिच्छ वातावरणात सुकलेल्या मच्छीची भुकटी तयार करण्यात येते. या भुकटीचा वापर खत तसेच जिवंत माशांचे खाद्य म्हणून केले जात असल्याची माहिती काही जाणकारांनी दिली आहे. मात्र, या प्रक्रियेदरम्यान आजूबाजूला दुर्गंधी पसरू नये म्हणून कोणतीही काळजी घेतली जात नसल्याने पसरणाऱ्या दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त आहेत.

भुकटी तयार करणाऱ्या कारखान्यांना ताकीद

दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारखान्यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. नोटिसीद्वारे रात्रीच्या उत्पादन प्रक्रिया बंद ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या असल्याची माहिती प्रदूषण मंडळाचे अधिकारी वैभव भालेराव यांनी दिली आहे.

### तळीरामांनो, सावधान!

त्यातच कोणत्याही फार्म हाऊसवर दारू विक्री अथवा पिण्यास सक्त मनाई असताना पूर्व विभागातील एका प्रसिद्ध वॉटरपार्कमध्ये सर्रास दारूची विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळालेली आहे. त्यातच त्या वॉटर पार्कवर रात्रीच्या वेळी मुजऱ्याचे कार्यक्रमसुद्धा होत असल्याने कळत-नकळत चरस, गांजा सेवन करणारे आंबट शौकीन मोठ्या प्रमाणात पूर्व विभागात येतात. एकंदरीत, रम-रमा-रमीची रेलचेल पूर्व विभागातील फार्म हाऊसमध्ये होणार यात काही शंकाच नाही. त्यामुळे खाकीवाल्यांनी यावेळेला या आंबट शौकिनांबरोबर अमली पदार्थ विक्री करणाऱ्या टोळक्यांवरदेखील बारीक नजर ठेवली आहे.

### बीडमध्ये मूक मोर्चा

आरोपी सुदर्शन घुले आणि कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे हे तिघे फरार आहेत. तसेच मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड हे संतोष देशमुख हत्याकांडातील मास्टर माईंड असल्याची चर्चा असून, या प्रकरणाशी संबंधित असलेल्या पवन ऊर्जा प्रकल्पाच्या खंडणी प्रकरणात त्यांचे नाव आलेले आहे. दरम्यान संतोष देशमुख हत्याकांडातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांना फाशी देण्यात यावी. तसेच या गुन्ह्यात वाल्मीक कराड यांचाही आरोपी म्हणून समावेश करण्यात यावा यासाठी तसेच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षेच्या मागणीसाठी बीडमध्ये मूक मोर्चात रस्त्यावर जनसागर उसळला. सर्वपक्षीय मूक मोर्चाला विराट स्वरूप आले. बीडमधील या सर्वपक्षीय मूक मोर्चामध्ये देशमुख कुटुंबीय सहभागी झाले. या मोर्चात महिलाही मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या. संतोष देशमुख त्याप्रकरणातील आरोपीला अटक करा, अशा घोषणा देण्यात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मोर्चाला सुरुवात झाली. सुभाष रोडवरून हा मोर्चा पुढे गेला. अण्णाभाऊ साठे चौक ते छत्रपती शिवाजीराज चौकापर्यंत हा विराट मोर्चा निघाला.

मोर्चात काळे झेंडे आणि संतोष देशमुख यांना न्याय देण्याची मागणी करणारे फलक या मोर्चात दिसून आले. मूक मोर्चामध्ये सर्वपक्षीय नेते सहभागी झाले. सुरेश धस, बजरंग सोनवणे, संभाजीराजे छत्रपती, संदीप क्षीरसागर, ज्योती मेटे, प्रकाश सोळंके, जितेंद्र आव्हाड, अभिमन्यू पवार, मेहबूब शेख या मोर्चामध्ये सहभागी झाले. यासोबतच मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे-पाटील देखील या मोर्चामध्ये सहभागी झाले.

### कृषीवलच्या दणक्याने खांडाकरांना शुद्ध पाणी

खांडा गावामध्ये नेरळ नळपाणी योजनेचे सोडण्यात येणाऱ्या पाण्यात जिवंत अळ्या येत होत्या.तसेच चार-पाच दिवस सातत्याने दूषित सांडपाणीमिश्रित पाणी येत असल्याने ग्रामस्थ संतप्त झाले होते. शेवटी स्थानिक ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते मनोहर हजारे यांनी ग्रामपंचायतचे प्रशासक सुंजित धनगर आणि ग्रामपंचायत अधिकारी अरुण कारले यांची ग्रामपंचायत कार्यालयात भेट घेऊन ग्रामस्थांची अडचण दूर करण्याची मागणी केली होती. अडचण दूर केली नाही तर खांडा ग्रामस्थ हंडा मोर्चा काढतील, असा इशारा दिला होता. त्यावेळी खांडा गावातील महिलांनी नळाद्वारे येणारे पाणी हे अत्यंत गढूळ येते आणि त्या पाण्याला सांडपाण्याची दुर्गंधी येते, त्याचवेळी त्या पाण्यात जिवंत अळ्या फिरत असल्याचे दिसून येत असल्याची तक्रार नोंदवण्यात आली होती. त्यानंतर नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे पथकाने खांडा गावात जाऊन त्या अशुद्ध पाण्याचे नमुने घेतले आणि अलिबाग येथे तपासणीसाठी पाठवले.

त्यानंतर नेरळ ग्रामपंचायतीकडून नेरळ ग्रामपंचायतीमधील खांडा भागाला पाणीपुरवठा करणारे मुख्य जलकुंभ ते खांडा गाव या भागातील जलवाहिनी तपासण्याचे काम सुरू केले. त्यावेळी ग्रामपंचायतचे आरोग्य खात्याचे कर्मचारी यांच्यासोबत स्थानिक ग्रामस्थ मनोहर हजारे कायम सोबत होते. कोतवाल वाडीच्या बाजूने येणाऱ्या नाल्याचे बाजूने मोहाची वाडी जलकुंभ येथून येणारी पाणी वाहून नेणारी जलवाहिनी होती आणि त्या जलवाहिनीमधून संपूर्ण खांडा गावाला अशुद्ध पाणी पोहोचत होते. गटाराचे सांडपाणी जलवाहिनीमधून जात होते आणि त्यामुळे गटाराचे पाण्यात असलेल्या अळ्या त्या जलवाहिनीमधून घरोघरी पोहोचत होत्या. मात्र, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी तब्बल दोन दिवस त्या सर्व जलवाहिन्या उघडून त्यांची तपासणी केल्यावर ही समस्या आढळून आली. जलवाहिनी तपासणी करण्याचे काम पूर्ण झाल्यावर शनिवारी सकाळी खांडा गावातील सर्व ग्रामस्थांच्या घरातील नळाला शुद्ध आणि चकचकीत पाणी आले आणि त्या सर्व ग्रामस्थांनी मनोहर हजारे यांच्या चिकाटीचे कौतुक केले.

### पाच मुलांना विषबाधा

जाणारा शोरमा हा खाद्यपदार्थ शुभम पाटील, शुभम ठाकूर, निशांत भगत, रोहन पाटील व एक लहान मुलगा यांनी खाल्ल्याने त्यांना पोटात दुखायला लागले, तसेच उलट्या होऊ लागल्याने त्यांना तातडीने चिरनेर गावातील रवि क्लिनिक रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले. रुग्णालयातील डॉ. प्रकाश मेहता यांनी त्यांच्यावर तात्काळ उपचार केले आहेत. तरी, अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या उघड्यावरील विक्री करणाऱ्या अशा व्यावसायिकांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.

### अपघातात एकाचा दुर्दैवी मृत्यू

एम.एच. ०६ बीएक्स १८८३ वरून रोहा येथून माणगावच्या दिशेने जात होते. इनोव्हा गाडी क्र. एम.एच. ०६ सी.एस. ३४९९ ही गाडी मुंबईच्या दिशेने माणगावकडे जात असताना इंदापूरनजीक वावेदिवाळी येथे इनोव्हा कारने मागून दुचाकी वाहनाला जोरदार धडक दिली. त्यामुळे राजाराम धारदेवकर यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास माणगाव पोलीस करीत आहेत.

### '...तर महिलांवरील चिखलफेक थांबेल'

मी विनंती करते, स्वतःच्या राजकारणासाठी कुत्सितपणे टिप्पणी केली. त्यांनी माझी नव्हे, अनेक महिलांची माफी मागावी. याविरुद्ध महिला आयोगाकडे तक्रार केली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना भेटली आहे. आपला टीआरपी वाढविण्यासाठी अशी टिपण्णी केली जाते. मात्र, त्याचा आमच्या कुटुंबियांना त्रास होतो. माझ्या भावाने सोशल अकाऊंट बंद केले. माझ्या आईला झोप नाही, असेही यावेळी प्राजक्ता माळी यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली आहे की, युट्यूबर आणि चॅनेलच्या बाबतीत नियम करावे. कुठली सत्यता न पडताळता आपली टीआरपी वाढविण्यासाठी बातमी करणाऱ्याविरुद्ध ठोस कारवाई करावी.

करुणाताई यांनी खातरजमा करुन मीडियासमोर बोलावे, अशी विनंती प्राजक्ता माळी यांनी केली. राजकीय पुढाऱ्याने आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी जाणार नाहीत. पुरुष कलाकारांची नावे का येत नाहीत. न्यूज पेपरमध्ये पण वाटेल ते मथळे देऊन बातमी करता, ते योग्य आहे का? असा प्रश्न उपस्थित केला.

एआयच्या जमान्यात आहोत. कुठला ही फोटो मोर्फ करू शकतो. सिनेक्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या वतीने मी बोलते आहे, असे माळी म्हणाल्या.

# भटक्या कुत्र्यांची दहशत

**। कोर्लई । वार्ताहर।**

गेल्या अनेक महिन्यांपासून मुरुडसह तालुक्यातील विविध ठिकाणी भटक्या कुत्र्यांची दहशत असून, अनेकांना आतापर्यंत श्वानदंशाला सामोरे जावे लागले असून, नागरिकांची डोकेदुखी ठरत आहे. भटक्या कुत्र्यांच्या त्रासापासून सुटका मिळवण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत व नगरपरिषद प्रशासन दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करणार काय, असा सवाल जनमानसातून विचारला जात आहे. मुरुड तालुक्यात अनेक ठिकाणी तसेच समुद्र किनाऱ्यावर गेल्या अनेक दिवसांपासून विशेष करून सकाळच्या वेळेत भटक्या कुत्र्यांची दहशत असून, पर्यटक व नागरिकांची डोकेदुखी ठरत आहे. याकडे शासनाच्या संबंधित तसेच नगरपरिषदेच्या असलेल्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त होत असून, योग्य ती उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे.



# कोळशाने भरलेल्या ट्रकला आग



**। पनवेल । वार्ताहर ।**

जेएनपीटी ते पळस्पेकडे जाणाऱ्या रस्त्यावर निसर्ग ढाब्याजवळ २६ डिसेंबर रोजी पहाटे सव्वाचार वाजण्याच्या सुमारास कोळसा भरलेल्या ट्रकला (क्र. एमएच ४२ बीएफ ३१३१) आग लागली होती. वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे फायर ब्रिगेडच्या मदतीने ही आग विझवण्यात आली. त्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली.

रात्रगस्तीदरम्यान उरणवरून पनवेलकडे येत असताना वाहतूक शाखेचे पीएसआय मनोज महाडिक व चालक निकम, पोलीस शिपाई चव्हाण यांनी एका कोळसा घेऊन जाणाऱ्या ट्रकला आग लागली असल्याचे पाहिले. त्यानंतर वाहतूक पोलिसांनी तात्काळ पनवेल महानगरपालिका फायर ब्रिगेडला बोलावले. फायर ब्रिगेडची गाडी येऊन त्यांनी ही आग वेळीच आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे.

# टीएमसीचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर उत्साहात





**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील जे.बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगावच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर दि. १९ ते २५ डिसेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्‌घाटन महविद्यालय विकास समितीचे सदस्य रामदास पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वयक तुलशिदास मोकल यांच्या हस्ते व प्रा. हर्षल जोशी, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, मान्यवर मंडळी तसेच ताम्हाणे ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

एकूण सात दिवसात किशोर शिताळे, दर्पण जाधव, सिद्धेश रघुवीर (श्रीवर्धन), प्रा. श्रीनिवास वारखंडकर, प्रा. डॉ. योगेश बोराळे, नूरखाँ पठाण, डॉ. पराग पिंपळापुरे यांप्रमाणे विविध वक्त्यांकडून मार्गदर्शन आणि माहिती शिबिरातील विद्यार्थ्यांना प्राप्त झाली. या सात दिवसीय शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातून गावामध्ये स्वच्छता केली, शोषखड्डे, स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता स्वच्छ करून स्मशान शेडला जोडणारा रस्ता माती टाकून व्यवस्थित केला, गावातील रस्त्यावर पडलेले खड्डे खडी व माती टाकून दुरूस्त केले. तसेच स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, मतदान जनजागृती, प्रदूषण एक समस्या आणि एचआयव्ही एड्स या विषयांवर विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून जनजागृती केली. गावातून रॅली काढून स्वच्छता एचआयव्ही एड्सवर जनजागृती केली. गावचा आर्थिक सामाजिक सर्वेक्षण केले. २४ डिसेंबर ला सायंकाळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले व याला ताम्हाणे ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद दिला. २५ डिसेंबर रोजी शिबिराचा समारोप करण्यात आला. या समारोप कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून जे.बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत व प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा व सत्र न्यायालयाचे ॲड. कौस्तुभ धामणकर तसेच ताम्हाणे गावचे पोलीस पाटील शशिकांत मोरे, चंद्रकांत धाडवे, बळीराम धाडवे, पांडुरंग मोरे, जगदीश पवार आदी उपस्थित होते.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी महविद्यालयाचे प्र. प्राचार्य हर्षल जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. जगदीश शिगवण, प्रा. अशोक मोरे, प्रा. अमित बाकाडे, प्रा. नितीन मुटकुळे, दिनेश कुळे, श्री. पाटील, श्री. बक्कम, शिक्षकेतर कर्मचारी, ताम्हाणे ग्रामस्थ व कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

**निवडक**

### बॅनर लावल्याप्रकरणी गुन्हा

**पनवेल :** बस स्थानकाच्या समोर पनवेल महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता बॅनर लावून शहराचे विद्रुपीकरण केल्याबद्दल पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पनवेल महानगरपालिकेचे प्रभारी अधिक्षक यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात आरोपीने पनवेल महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता बॅनर लावून शहराचे विद्रुपीकरण करत आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली असून गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

### जनरल स्टोअर्समध्ये चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील परदेशी आळी येथे असणाऱ्या शौकीन पान शॉप आणि जनरल स्टोअर्समध्ये चोरी झाल्याची घटना घडली आहे. या पान शॉपचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करत आतील दुकानातील रोख रक्कमेसह इतर साहित्य मिळून असा जवळपास ४० हजाराच्या आसपास मुद्देमाल चोरुन नेला आहे. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचले व त्यांनी पुढील तपास सुरू केला आहे.

### शिक्षण परिषद संपन्न

**माणगाव :** तालुक्यातील तळाशेत केंद्राची शिक्षण परिषद राजिप शाळा रुद्रवली येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाली. यावेळी, केंद्रप्रमुख गणेश ढेपे, निकीता दांडेकर तसेच वावे दिवाळीचे केंद्रप्रमुख सुधीर निकम उपस्थित होते. शैक्षणिक विचारांची व उपक्रमांची देवाणघेवाण करण्यासाठी या परिषदेचे आयोजन केले होते. तालुकास्तरावरील क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेमध्ये नावलौकिक मिळवणाऱ्या वाढवण, तळाशेत, करंजेवाडी शाळांचा या परिषदेत सत्कार करण्यात आला.

### महिला मुक्ती दिन साजरा

**रोहा :** दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडीया तथा भारतीय बौध्द महासभा या धम्मसंस्थेच्या तालुका महिला विभागाच्यावतीने महिला मुक्ती दिन (मनुस्मृती दहन) संपन्न झाला. यावेळी मुंबई केंद्रीय प्रशिक्षण विभाग व उपप्रमुख केंद्रीय शिक्षिका सुप्रिया कासारे यांनी मनुस्मृती ग्रंथातील महिलांविरोधात होणारे अन्याय, अत्याचार या बाबत ग्रंथातील प्रत्येक कलमाची अभ्यासपुर्ण माहिती दिली. तालुका अध्याक्षा प्रतीभा शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला.

### रोह्यातील बाजारपेठ बंद

**रोहा :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी अवमानकारक उद्गार काढले होते. त्यामुळे रोह्यातील संतप्त बौद्ध समाज बांधवांनी अमित शाहा यांचा फोटो असलेल्या बॅनरला जोडे मारून व घोषणाबाजी करत आपला संताप व्यक्त केला. तसेच, अमित शाहांच्या राजीनाम्याची मागणी करत आंबेडकरांच्या नावाने फॅशन नाही तर देशातील शासन चालते असे फळक झलकावले. या मोर्च्याचा अनुषंगाने रोहे बाजार पेठ बंद करून व्यापरी बांधवांनी बंदला सहकार्य केले.

# आरसेटीला महिला सक्षमीकरणाचा ध्यास

## ■ कागदी पिशवी, पाकीट बनविण्याचे प्रशिक्षण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अलिबागमधील बँक ऑफ इंडिया पुरस्कृत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान तथा आरसेटीने महिला सक्षमीकरणाचा ध्यास घेत रायगड जिल्ह्यातील महिलांना रोजगाराचे साधन उपलब्ध करून दिले आले. नुकतेच माणगाव येथे ग्रामीण भागातील महिलांसाठी कागदी पिशवी व पाकीट बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणाला महिलांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.**



अलिबाग शहराजनजीक पंतनगर येथे स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था कार्यरत आहे. या संस्थेच्या माध्यमातून शिवणकला, कुकटपालन, शेळी पालन अशा वेगवेगळ्या व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण देत असताना त्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे. त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहव्यात, यासाठी त्यांना व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे कामही या संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले आहे. आतापर्यंत रायगड जिल्ह्यातील २० हजारहून अधिक महिलांना या संस्थानच्या मार्फत प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच, अनेक महिलांनी प्रशिक्षण घेतल्यावर स्वतःचा व्यवसाय सुरु करून आर्थिक प्रगती साधण्याचा प्रयत्न केला आहे.

यावेळी माणगाव तालुक्यातील साले गावासह परिसरातील महिलांसाठी बँक ऑफ इंडिया पुरस्कृत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगडच्या मार्फत कागदी पिशवी व पाकीटे तयार करण्याचे दहा दिवसाचे प्रशिक्षण घेण्यात आले होते. यावेळी, कागदी पिशवी व पाकीटे बनविणे या विषयाचे सखोल ज्ञान, उद्योजकता विकास, मार्केटींग, बँकिग, आर्थिक साक्षरता याबरोबरच प्रकल्प अहवाल आदींचे मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी परीक्षा घेऊन संस्थानचे संचालक सुमितकुमार धनोरकर यांच्या हस्ते महिलांना प्रशस्तीपत्रक वाटप करण्यात आले. माणगाव तालुक्यातील राबविलेल्या या उपक्रमातून ग्रामीण भागात प्लास्टीक मुक्तीचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

> **बँक ऑफ इंडिया पुरस्कृत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान मार्फत कायमच वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. महिलांना सक्षम करण्याचा एक प्रयत्न सुरु करण्यात आला आहे. कागदी पिशवी व पाकीटे तयार करण्याच्या प्रशिक्षणात माणगाव तालुक्यातील साले गावासह आजुबाजूच्या गावातील असंख्य महिलांनी सहभाग घेतला. महिलांनी दिलेल्या वेळेचा व आरसेटीच्या प्रयत्नाचे यश म्हणजे लवकरच या प्रशिक्षणातून व्यवसायाची सुरुवात करावी. बँक ऑफ इंडिया व स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान कायमच महिलांच्या सोबत असणार आहे.**
> **– सुमितकुमार धनोरकर, संचालक, स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान**

# माणगावातील पुलाचे बांधकाम संथगतीने

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील काळ व गोद नदीवरील तसेच बाह्यवळण पुलाचे बांधकाम संथगतीने सुरू असल्याने वारंवार प्रवाशांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. या पुलाचे बांधकाम गेली ५ वर्षे कासवगतीने सुरू आहे. मध्यंतरीच्या काळात हे काम निधीअभावी रखडले होते. दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण तातडीने पूर्ण करण्यासाठी बेमुदत आमरण उपोषणाला विविध संघटनांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते. त्यामुळे या महामार्गाचे आणि या पुलाचे काम सुरू झाले आहे.

या नवीन पुलाचे बांधकाम २०१९ पासून सुरू झाले आहे. ५ वर्षे पूर्ण झाली तरी पुलाचे काम अर्धवट स्थितीत आहे. यामुळे, गेली अनेक वर्षे प्रवाशांची २-३ तास रखडपट्टी होत आहे. याबाबत खा. तटकरे आणि आ. गोगावले यांनी काळ नदीवरील पुल आणि महामार्ग वर्षभरात पूर्ण होईल असे आश्वासन दिले होते. मात्र, हे काम पूर्ण करण्यासाठी अजून कमीत कमी दोन वर्षे लागतील असे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगण्यात येत आहे.

माणगाव शहरातील काळ नदीवरील पूल हा अरुंद असल्याने तसेच शहरातील बाजारपेठेतून जाणाऱ्या महामार्गाचे चौपदरीकरण अद्यापही झालेले नाही. त्यामुळे वाहतुकीची कोंडी वाढतच चालली आहे. तसेच, बाजारपेठेतील अतिक्रमणे हटविण्यासाठी महामार्ग कार्यालयाने व्यावसायिकांना अनेक वेळा नोटीसा बजावल्या होत्या. मात्र, अतिक्रमणे हटविली नसल्याने पादचाऱ्यांना चालणे देखील अवघड होऊन बसले आहे.

# पर्यटकांची मुरुड-जंजिऱ्याला पसंती



**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

नाताळच्या सुट्टीदरम्यान मुरुड तालुक्यातील काशीद, मुरुड, नांदगाव समुद्रकिनारी व जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांनी मोठी गर्दी केली आहे. दरम्यान, तालुक्यातील राजपुरीकडे जाणारा रस्ता अरुंद असल्याने पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

नाताळ सुट्टीचा आनंद घेण्यासाठी मुरूड तालुक्यातील समुद्रकिनारी मोठ्या संख्येने पर्यटक अवतरले आहेत. पर्यटकांनी शुक्रवारी (दि.२७) सायंकाळपासून गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. हळू हळू सर्व लॉज हाऊसफुल्ल होत आहेत. दरम्यान, समुद्रकिनारी असणाऱ्या प्रत्येक स्टॉलवर गर्दी पहायला मिळत आहे. शनिवारी (दि.२८) देखील जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी औरंगाबाद, पुणे, कोल्हापूरसह मुंबई, कल्याण, डोंबवली, विरार, दहिसर व ठाणे आदी भागातील पर्यटक मोठ्या संख्येने आले होते. यावेळी, राजपूरी रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांची मोठी गर्दी होऊन काही काळ वाहतूक कोंडी देखील झाली होती. मात्र, पोलीस आपली भूमिका चोख बजावत असल्याने वाहतुक सुरळीत होत होती.

### ■ किल्ला पाहण्यासाठी मोठ्या रांगा

## पित्याकडूनच मुलाचे अपहरण

**पनवेल :** कामोठे भागातून अपहरण करुन अहमदनगर मधील नेवासा येथे नेण्यात आलेल्या ७ वर्षीय मुलाचा कामोठे पोलिसांनी अवघ्या ६ तासामध्ये शोध घेतला आहे. या प्रकरणाच्या तपासानंतर अपहृत मुलाला त्याच्या वडीलानेच नेवासा येथे नेल्याचे उघडकीस आले आहे. अपहृत मुलाचे आई-वडील मागील चार-पाच वर्षांपासून वेगळे राहत आहेत. हा मुलगा आईकडे राहण्यासाठी गेल्यानंतर भंगार गोळा करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर वडिलांनी मुलाला सोबत नेल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. या मुलाच्या आई-वडिलांचा कायदेशीर घटस्फोट न झाल्यामुळे सध्या मुलाचा ताबा त्याच्या पित्याकडे देण्यात आला आहे.



**● नाताळ सुट्टीनिमित्त शनिवारी (दि.२८) मुरूड तालुक्यातील राजपुरी येथील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांनी गर्दी केली. सकाळी पडलेल्या धुक्यात शिडाच्या बोटींने प्रवास करण्याचा वेगळाच आनंद पर्यटकांनी घेतला.** (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# गोव्यातून येणाऱ्या वाहनांवर करडी नजर



**। पनवेल । वार्ताहर ।**

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पनवेल नगरी सज्ज होऊ लागली आहे. काही दिवसांवर 'थर्टी फर्स्ट' आल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून गोव्यावरून येणाऱ्या वाहनावर तसेच अवैध, चोरटी मद्य विक्री रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने भरारी पथके पनवेल परिसरात तैनात केली आहेत.

थर्टी फर्स्टला सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी तरुणाई सज्ज झाली आहे. पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात फॉर्म हाऊस असल्यामूळे मित्र मंडळीकडून थर्टी फस्ट साजरा करण्यासाठी बेत आखले जात आहेत. विशेष म्हणजे गोवा येथे दारू स्वस्त उपलब्ध होत असल्यामुळे चोरीने दारू विक्री करणारे दारू विक्रेते, चायनीज विक्रेते, ढाबा तसेच बहुतांश नागरिक हे गोवा वरून स्वस्त दरात मद्य घेवून येण्याची शक्यता अधिक असल्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाची मद्य तस्करावर करडी नजर राहणार आहे.

> **गोव्यावरून पनवेल, नवी मुंबई, ठाणे आणि मुंबई परिसरात मोठ्या प्रमाणात बसेस येतात. विशेष थर्टी फर्स्टसाठी लागणारे मद्य हे वाहनातून घेऊन येतात. त्यामुळे गोव्यावरून येणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यासाठी सात कर्मचारी अधिकाऱ्यांचे पथक तैनात करण्यात आले असून रात्री दोन ते तीन वाजेपर्यंत वाहनांचा कसून तपास केला जात आहे.**
> **– कृष्णा देवरे, अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभाग, पनवेल**

# शाळा मोजतेय अखेरची घटका

## विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका

**। उरण । वार्ताहर ।**

दिघोडेगावातील मुलांना शिक्षण घेता यावे, या उद्देशातून ग्रामस्थांनी शासनाच्या देखरेखीखाली शाळेची इमारत उभारण्यात आली होती. परंतु, या शाळेची इमारत आता अखेरची घटका मोजत आहे. या ऐतिहासिक वारसा असलेल्या दिघोडे गावातील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत एकूण ११७ विद्यार्थी अभ्यासाचे धडे गिरवत असून शाळेच्या इमारतीच्या दुरवस्थामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. तरी, राज्याचे नवनिर्वाचित शिक्षणमंत्री दादाजी भूसे यांनी या शाळेच्या इमारतीची पाहणी करून नव्याने इमारतीचे बांधकाम करण्यासाठी शासनस्तरावर पुढाकार घ्यावा, अशी मागणी पालक वर्ग करत आहेत.





दिघोडे गावातील मूलांना दर्जेदार शिक्षण मिळावेयासाठी दिघोडे गावातील ग्रामस्थांनी एकदिलाने शासनाच्या देखरेखीखाली रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या इमारतीची उभारणी केली होती. या शाळेत शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी हे उच्च पदावर पोहचून त्यांनी समाजहिताची कामे केली आहेत. आज त्याच प्राथमिक शाळेच्या इमारतीत पहिली ते चौथीच्या वर्गात एकून ११७ विद्यार्थी अभ्यासाचे धडे गिरवत आहेत. अशा शाळेच्या प्रत्येक वर्ग खोल्यांची दुरवस्था झाली असून कौलारू छप्पर विद्यार्थ्यांच्या डोक्यावर पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊन दिघोडे नावासह शाळेचे अस्तित्वही नाहीसे होण्याच्या मार्गावर आहे. तरी, राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भूसे यांनी सदर शाळेच्या इमारतीची पाहणी करून नव्याने इमारतीचे बांधकाम करण्यासाठी शासनस्तरावर पुढाकार घ्यावा, अशी मागणी पालक वर्गाकडून करण्यात येत आहे.

> **राजिप दिघोडे शाळेत पहिली ते चौथीच्या वर्गात एकूण ११७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आज या शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाली असून विद्यार्थ्यांच्या डोक्यावरील छप्पर केव्हाही पडेल असे भयानक चित्र आहे. तसेच, संगणक प्रशिक्षण वर्ग खोल्यांची दुरावस्था झाली आहे. तरी, या शाळेच्या इमारतीचे नव्याने बांधकाम करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा.**
> **– नवनीत माळी, मुख्याध्यापक**

## कर्जत येथे जैवविविधतेचे प्रदर्शन

# बांबू रिसोर्स संस्थेचा पुढाकार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यात आदिवासी भागातील पारंपरिक बी बियाणांचे महत्व सांगणारे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे प्रदर्शन आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या माध्यमातून भरविण्यात आले होते. त्यात जैवविविधता प्रदर्शन पाहण्यासाठी आदिवासी भागातील ग्रामस्थांनी गर्दी केल्याने शेतकरी देखील पारंपरिक बी बियाणे यांच्याबाबत सजग असल्याचे दिसून आले.**



कर्जत तालुक्यातील आदिवासी भागाचे मुख्यालय असलेल्या कशेळे येथे असलेल्या अक्षदा मंगला कार्यालयात हे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन पेण आदिवासी विकास प्रकल्पाचे अधिकारी भिसे, तसेच प्रादेशिक भात संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ यांचे हस्ते झाले. यावेळी मुंबई, मुरबाड, खालापूर, खोपोली, सुधागड-पाली, पेण, अलिबाग व पनवेल या विभागातून पारंपारिक बियाणे जैवविविधता प्रदर्शन पाहण्यासाठी लोक आले होते. तसेच, स्थानिक भागातील ज्ञानानुभव माध्यमिक विद्यालय तसेच स्थानिक आदिवासी संस्थेंमध्ये कार्यरत विद्यार्थी यांनी प्रदर्शन यांनी पाहणी करण्यासाठी गर्दी केली होती.

ग्रामीण भागातील पारंपरिक शेती नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्या पार्शवभूमीवर पारंपरिक वापरातील बियाणे नष्ट होऊ नये म्हणून आणि शेतकऱ्यांकडून विविध संकरीत प्रजातीच्या बियाणांचा मोठ्या प्रमाणावर होत असलेला वापर यांच्याबाबत शेतकऱ्यांना जागरूक करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने पावले उचलली आहेत. त्यानुसार आदिवासी विकास विभाग पेण प्रकल्प अंतर्गत पारंपरिक बी बियाणे यांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.

### गावठी बियाणांची मांडणी

**या जैवविविधता प्रदर्शनामध्ये ११ प्रकारची देशी कंदमुळे, ३७ औषधी वनस्पती, २४ आयुर्वेदिक झाडांच्या साली, देशी ३०० भाताचे बियाणे, १२ प्रकारचे देशी कडधान्य बियाणे, १५ प्रकारचे गावठी भाजीपाला बियाणे, ५ प्रकारच्या जंगली शेंगा, ४ प्रकारच्या देशी तेल बिया व वेगवेगळ्या प्रकारचे वनोपज आदी प्रकारचे गावठी बियाणांची जैवविविधता प्रदर्शनामध्ये मांडणी करण्यात आली होती.**

> **जैवविविधता प्रदर्शन आयोजित करण्यामागे पारंपरिक बियाणांचा प्रचार-प्रसार करणे, पारंपरिक देशी बियाणांच्या प्रदर्शनातून लोकांमध्ये वाणांची मोठ्या प्रमाणात प्रसार करून लागवड वाढवणे, पारंपरिक बियाणे जतन करून लोकांना लागवडीसाठी प्रवृत्त करणे हा आमचा उद्देश आहे.**
> **–मंजुषा खेडकर, सचिव, बांबू रिसर्च सेंटर**

या जैवविविधता प्रदर्शनच्या आयोजनात बांबू रिसोर्स संस्थेच्या सचिव मंजुषा खेडकर, हरिदास नायर, कीस्टोन फॉउंडेशन तर्फे अनिल हरपुडे, बन्सी घेवडे, बाजीराव पोखरकर आणि कृष्णा पादीर यांचा पुढाकार होता.

बैठक



श्री. पन्नालालजी तापडिया
इनका देवलोक गमन मंगलवार दि. 24 दिसंबर 2024 को हुआ
बैठक
रविवार दि. 29 दिसंबर 2024
समय- दोप. 2 से 4 बजे
समाज मंदीर, झिराडपाडा, झिराड, अलिबाग में रखी गयी है।
: शोकाकुल :
लाभचंद, राधावल्लभ, ओमप्रकाश, कमलकिशोर (भ्राता)
नवरतन (पुत्र)
रेखा - निलेशजी (बेटी-दामाद)
सुंदरलाल, विमल (भतीजा)
समस्त तापडिया परिवार, श्री बालाजी (नागौर)
ANUP

# नेरळ स्थानकातील चौथ्या पादचारी पुलाचे काम सुरु

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेवरील नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकातील फलाट एकवर नवीन पादचारी पूल उभारण्यात येणार आहे. कर्जत एन्डकडे हा नवीन नवीन पादचारी पूल बांधला जात असून, या पुलामुळे नेरळ पूर्व भागात जाणाऱ्या प्रवाशांना फायदेशीर ठरणारे आहे.



नेरळ स्थानकाच्या मेक ओव्हरमध्ये नेरळ स्थानकातील फलाट एक वर नव्याने निवारा शेड आणि पादचारी पूल बनविले जात आहेत. त्यात नेरळ स्थानकातील चौथा पादचारी पूल कर्जत दिशेकडे बनविले जाणार आहे. कर्जत दिशेकडे अगदी फलाटाच्या शेवटी हा नवीन पादचारी पूल बनविला जात आहे. नेरळ स्थानकात यापूर्वी दोन पादचारी पूल कार्यान्वित झाले असून, तिसरा पादचारी पूल काही दिवसांनी कार्यान्वित होणार आहे. मात्र त्यानंतर आता मुंबई रेल कॉर्पोरेशनकडून कर्जत दिशेकडे हा नवीन पादचारी पुलाचे काम सुरु करण्यात आले आहे. हा नवीन पंचादरी पूल नेरळ स्थानकातील फलाट एकवरील चौथे पादचारी पूल ठरणार आहे.

या नवीन पादचारी पुलामुळे नेरळ स्थानकातून जिते, मातोश्रीनगर आदी पूर्व भागात जाणाऱ्या प्रवासी यांच्यासाठी हा नवीन पादचारी पूल फायदेशीर ठरणार आहे. या नवीन पादचारी पुलाच्या कामाबद्दल नेरळ प्रवासी संघटना यांच्याकडून अध्यक्ष संदीप म्हसकर यांनी मध्य रेल्वे प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## ग्रामस्थांची पाणीटंचाईवर मात



**। तळा । वार्ताहर ।**

पन्हेळी येथे लोकसहभागातून व कृषी विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली वनराई बंधारे बांधण्यात आले. पन्हेळी गावात दरवर्षी जानेवारी महिन्यापासून तीव्र पाणीटंचाई निर्माण होते त्यामुळे पाण्याअभावी रब्बी पिकांना पाणी मिळत नाही, त्यामुळे पिकाच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो. यावर मात करण्यासाठी ग्रामस्थ प्रत्येक वर्षी वनराई बांधारे बांधण्याचा उपक्रम हाती घेत असतात. याहीवर्षी ग्रामस्थांनी वनराई बंधारे बांधण्यास सुरुवात केली आहे.

गावात दरवर्षी ५ ते ६ बंधारे बांधण्यात येतात. या बंधाऱ्यासाठी लागणाऱ्या पिशव्यांचा पुरवठा कृषी विभागामार्फत करण्यात आला आहे. बंधाऱ्यामुळे पन्हेळी गावातील सुमारे १० ते १५ एकर क्षेत्रांवरील भाजीपाला व कडधान्य पिके घेण्यात येतात. बांधाऱ्यांमुळे रब्बी हंगामातील काकडी,कलिंगड, कारली, मिरची पालेभाजी यांसारखी हंगामी पिके तसेच आंबा, काजू व फणस यांसारख्या बहुवार्षिक फळपिकांनाही फायदा होणार आहे तसेच जमिनीच्या पाणी पातळीतसुद्धा वाढ होत आहे. या श्रमदानावेळी गावचे सरपंच, उपसरपंच, गाव अध्यक्ष, ग्रामपंचायत सदस्य तसेच महिला मंडळ व कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी दिनेश चांदोरकर उपस्थित होते.

# वसंतराव ओसवाल जयंतीनिमित्त ब्लँकेट वाटप

## गीताताई पालरेचा व ओसवाल कुटुंबियांचा पुढाकार

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

सुधागड एज्युकेशन सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष, माजी कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांचे निकटवर्तीय व विश्वासू सहकारी, खासदार सुनील तटकरे यांच्यासोबत कौटुंबिक नाते असलेले, इतर मागासवर्गीय महामंडळाचे माजी अध्यक्ष वसंतराव गणेशमल ओसवाल यांचा ४ सप्टेंबर २०२४ रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी निधन झाले. कै. वसंतराव ओसवाल यांच्या जयंतीनिमित्त दि. २५ डिसेंबर रोजी सुधागडातील गोर-जनतेला ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.



■ कै. वसंतराव ओसवाल यांच्या जयंतीनिमित्त सुधागडातील गोरगरीब जनतेला ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. (छायाचित्र : धम्मशील सावंत)

गीताताई पालरेचा यांच्या व ओसवाल कुटुंबियांच्या पुढाकाराने हा सामाजिक, सेवाभावी व माणूसपण जपणारा उपक्रम राबविण्यात आला. रायगडच्या राजकारणातील एक संयमी आणि अष्टपैलू व्यक्तीमत्व म्हणून संपूर्ण राज्यात त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात कार्याचा ठसा गेली पाच दशके उमटवला. कै. दादासाहेब लिमये यांनी स्थापन केलेल्या सुधागड एज्युकेशन सोसायटीला सुवर्ण झळाळी देण्याचे कार्य केले. संस्थेचे आर्थिक, भौगोलिक व शैक्षणिक विकास त्यांनी त्यांच्या कारकीर्दीत चांगल्या पद्धतीने केले. मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य म्हणूनसुद्धा महत्वाची भूमिका बजावत शाळा-महाविद्यालयांचा भौगोलिक विकास, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास, तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचा आर्थिक विकास चांगल्या पद्धतीने होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले.

आदिवासी, कष्टकरी शोषित, वंचित घटकाच्या विकासाठी त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. बहुजन समाजाच्या उद्धरासाठी आणि विकासाठी त्यांनी झोकून देऊन काम केले. त्यांच्या पश्चात त्यांची मुलगी राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात धडाडीचे नेतृत्व असलेल्या गीताताई पालरेचा कार्य करीत आहेत. दि. २५ डिसेंबर रोजी कै. वसंतराव ओसवाल यांची जयंती असल्याकारणाने गीताताई पालरेचा यांच्या सहकार्याने व संपूर्ण ओसवाल कुटुंबियांच्या उपस्थितीत अनेक गावातील गोरगरीब जनतेला मोठ्या प्रमाणात ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. यामध्ये सुधागड तालुक्यातील कळंब, वाघोशी, नेणवली, घोटावडे, भाऊशेत, वाफेघर, भार्जे, गोकुळपाडा, खांडपोली, मानखोरा, पावसाळा इतर अनेक आदिवासीवाडीतील गोरगरीब ग्रामस्थ जनतेला साधारण ६०० ब्लँकेटचे वाटप त्या त्या गावातील सरपंच, उपसरपंच, सामाजिक कार्यकर्ते यांच्या हस्ते करण्यात आले. सध्या सुधागड तालुक्यात थंडीचा प्रमाण वाढत असल्याने अशा प्रकारच्या मदतीने गोरगरीब जनतेच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

# वातावरण बदलामुळे आजारांत वाढ

**। सुकेळी । वार्ताहर ।**

सद्यःस्थितीत डिसेंबर महिना सुरु झाल्यापासून वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल घडत आहेत. गेल्या आठ ते दहा दिवसांपासून वातावरणात ढगाळ तसेच थंडीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा या वातावरणामुळे नागोठणे विभागासह ऐनघर परिसरातील नागरिकांच्या आजारपणात मोठी वाढ झाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

वातावरणात सध्या वेगळीच स्थिती निर्माण झाली असून, कधी ढगाळ वातावरण तर कधी वातावरणातील वाढलेली उष्णता नागरिकांचे आरोग्य बिघडत आहे. यामध्ये अनेक नागरीकांना ताप, सर्दी, खोकळा, टायफाईड, मलेरिया, डेंग्यू अशा आजारांचा सामना करावा लागत आहे. या आजारपणामुळे सध्या सर्वत्र दवाखाने फुल्ल झाले आहेत. तरी, याबाबतीत कोणालाही ताप, सर्दी, खोकळा अशी काही लक्षणे असल्यास त्वरित दवाखान्यात जाऊन योग्य ते उपचार घ्यावेत, असे आवाहन सुकेळी येथील जिंदाल रुग्णालयातील डॉ. मनीष रायकवार यांनी केले आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. भरत दत्तु पाटील रा. डोलवी, तालुका-पेण, जिल्हा - रायगड यांनी खालील वर्णनांची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्रीमती विजया हरीभाऊ शिंदे रा. जुई अब्बास, तालुका-पेण, जिल्हा - रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली असुन तसा साठेकरार ही करण्यात आलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन** जिल्हा रायगड पोट तुकडी पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, ग्रुप ग्रामपंचायत खारपाले, मौजे- खारपाले, येथील गट नं. ३२/४ एकुण क्षेत्र ०-२४-३० हे.आर.चौ.मी. आकार रु.२--१२ पैसे ही जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-२४-३० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. २९/१२/२०२४.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील.**
परमार प्लाझा, शॉप नं. १६.
तळ मजला, शिवाजी पथ,
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९



### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ.चारील डिसोझा, श्री.बोनी डिसोझा यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे माले, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १५/८/अ/१ एकुण ०.४०.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २९/१२/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८



### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल अमजद शेख यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तीचे मालक १. असगर मोसिन खोत व २. मोहमद शोएब मोहमद युसुफ काझी याचेंकडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. ममदापुर, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १५६ | ४ | १७५-०० | १७-५० |

तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **चौदा दिवसांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजामुक्त आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. २९/१२/२०२४.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो. - ९३२५०६००३७.



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकीहक्क निर्वेध असल्याची खात्री करून तसा दाखला देणेबाबत खाली सही करणार यांना विनंती केली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील-**

| गट क्रमांक | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | विद्यमान मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ८३ | ०-४६-००<br>पो.ख. ०-०४-६०<br>०-५०-६० | २-६२ | प्रभाकर नामदेव मापगावकर<br>प्रमोद नामदेव मापगावकर |

येणेप्रमाणे वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखला उपलब्ध महसूली व मालकीहक्क दर्शविणारी कागदपत्रे पाहून अदा करण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक :-२७/१२/२०२४

**ॲड. रविंद्र वि. ओक**
गुरूकृपा, महर्षी कर्वे रोड,
द्वारका हॉटेल समोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड



प्रोसेस जमा
दि.

अर्जदारातर्फे वकिल
ॲड. अनघा तुरकर
ॲड. अतुल तुरकर

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**
दि.चौ.अर्ज नं. २२९/२०२४

### जाहीर नोटीस

१) श्रीमती. दिप्ती महेंद्र अलिबागकर,
वय-४१ वर्षे, व्यवसाय : गृहीणी
२) कु. स्वयम महेंद्र अलिबागकर,
वय १४ वर्षे, धंदा शिक्षण, अर्जदार
३) शुभम महेंद्र अलिबागकर,
वय १४ वर्षे, धंदा शिक्षण,
नं. २ व ३ करीता अ.पा.क. आई
म्हणून श्रीमती. दिप्ती महेंद्र अलिबागकर
सर्व रा. आय.ई.एस. शाळेजवळ,
वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड
विरूद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ आणि ३ यांचे वडील कै.महेंद्र मोतीराम अलिबागकर हे दिनांक २८/०३/२०२४ रोजी मयत झाले असून त्यांस अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत.

कै. महेंद्र मोतीराम अलिबागकर यांचे कायदेशीर वारस म्हणुन वारस दाखला मिळावा म्हणून या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना कै. महेंद्र मोतीराम अलिबागकर यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दि. २०/०१/२०२५ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे कै.महेंद्र मोतीराम अलिबागकर यांचे वारस म्हणून वारस दाखला देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांत येवून मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकूम अर्जदार यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि. २४ माहे, डिसेंबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
**लिपीक**
**दिवाणी न्यायाधिश**
**व. स्तर अलिबाग**

(कोर्टाचा शिक्का)

सही /-
**अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय**
**व. स्तर अलिबाग**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक अरुण कृष्णा देशमुख यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ६ | २ | ०-४३-७० | ३-७५ |

सबब सदर वर नमुद केलेल्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेली मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : - २९/१२/२०२४

**ॲड. सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.



### कागतपत्र हरवले आहेत

मी रेखा बटूसिंग चित्ते अलिबाग ते शिरपूर प्रवास करीत असताना माझे महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल सर्टीफिकेट हरवले आहे. त्यासंदर्भात अलिबाग पोलिस ठाण्यात तक्रार केली असून त्याचा रजिस्टर नं.XVIII8657 असा आहे. तरी ते कोणाला सापडल्यास त्वरीत संपर्क करा. मो. ७९७२८२१५१९,

सही/
**रेखा बटूसिंग चित्ते**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री प्रकाश एन शहा व इतर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :- मौजे पाली त कोतलखलाटी तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर ३०/३, ३०/६, १३/८,२८/२/अ, १०/९, ११/२ब२, १३/१६ब, १३/८, १४/४, १४/५, १४/६, १४/७, १४/८, १६/१४अ, १६/१४ब, १६/१५, १६/१८, १६/१९, १६/२, १६/३, १६/८, १६/९, १७/१, १७/२, १७/२, १७/३, १७/४, १७/५, १७/७, १८/५अ, १८/५क, १९/१, १९/१०, १९/४, १९/६, १९/७अ, १९/७ब, १९/८अ, १९/९अ, २०/१, २०/२, २०/३, २०/४, २०/५, २२/१०, २२/११, २२/२अ, २२/२ब, २२/४, २२/९, २८/१, २८/२क, २८/२ड, २८/२ब, २९/१, २९/२, २९/३, २९/४अ१, २९/४अ२, २९/४क, २९/४ब, २९/४अ, २९/५अ, २९/५ब, २९/६, ३०/१, ३०/१०, ३०/१२, ३०/१३, ३०/१४, १३/१६, ३०/१७, ३०/१८, ३०/१९, ३०/२, ३०/२०, ३०/२२, ३०/२३, ३०/३, ३०/४, ३०/६, ३०/७, ३०/८अ, ३०/८ब, ३०/९, ३१/३, ३१/५, ३२/२, ३२/३, ३२/६, ३२/२, २८/२क, १०/९, ११/२ब२, १३/१६ब, १४/४, १४/५, १४/६, १४/७, १४/८, १६/१२, १६/१४अ, १६/१४ब, १६/१५, १६/१८, १६/१९, १६/२, १६/३, १६/४, १६/६, १६/८, १६/८, १७/१, १७/२, १७/३, १७/४, १७/५, १७/७, १८/५अ, १८/५क, १९/१, १९/१०, १९/४, १९/६, १९/७अ, १९/७ब, १९/८अ,१९/९अ, २०/१, २०/१, २०/२, २०/३, २०/४, २०/५, २२/१, २२/१०, २२/११, २२/२अ, २२/२ब, २२/४, २२/९, २८/१, २८/२ड, २८/२ब,२९/१, २९/२, २९/३, २९/४अ१, २९/४अ२, २९/४क, २९/४ब, २९/५अ, २९/५ब,२९/६, ३०/१, ३०/१०, ३०/१२, ३०/१३, ३०/१४, ३०/१६, ३०/१७, ३०/१८, ३०/१९, ३०/२, ३०/२०, ३०/२२, ३०/२३, ३०/४, ३०/७, ३०/८अ, ३०/८ब, ३०/९, ३१/२, ३१/५, ३२/२, ३२/२, ३२/३, ३२/५, ३२/६, ३३/२ या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २९/१२/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,भारत गॅस समोर,
अमराई रोड,कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे बामणसुरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री.दिपक गणपत शिलधनकर, श्री.रघुवीर गणपत शिलधनकर, श्री. पांडुरंग गणपत शिलधनकर, श्रीमती इंदु प्रफुल्ल शिलधनकर, श्रीमती प्रविण प्रफुल्ल शिलधनकर, श्री. वैभव प्रफुल्ल शिलधनकर, सौ. साक्षी मुकेश वाल्मिकी पुर्वाश्रमीची पुनम प्रफुल्ल शिलधनकर, सर्व राहणार बोरी-उरण, ता.उरण, जि.रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान पुर्ण झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतःनिर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. दिपक गणपत शिलधनकर, श्री. रघुवीर गणपत शिलधनकर, श्री. पांडुरंग गणपत शिलधनकर, श्रीमती इंदु प्रफुल्ल शिलधनकर, श्रीमती प्रविण प्रफुल्ल शिलधनकर, श्री. वैभव प्रफुल्ल शिलधनकर, सौ. साक्षी मुकेश वाल्मिकी, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची लेखी हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्णकरतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बामणसुरे, ता. अलिबाग | १०६/३ | ०-१२-००<br>०-०८-०० पो.ख.<br>०-२०-०० एकूण | ००-२३ |

अलिबाग,
दिनांक :२८/१२/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

■ वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट – ९८२२२५७९२९

■ किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य – ९८२२२५७९२९

■ बोअरवेल विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे भूजल संशोधन ९२२६७६६१२९, ९३७०५१७९४९

■ शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९, ९३७०५१७९४९

■ अलिबाग आणि परिसरातील Bsc, Bcom, BA पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी. त्वरित संपर्क करा. ९४०३२१२१२१

■ अलिबाग शहर येथील हॉस्पिटलमध्ये नर्सची आवश्यकता आहे. संपर्क ९८५०३४८५०६, ९८२२४०९८४९.

■ रिसॉर्ट भाड्याने देणे आहे. ६ A/c Rooms, किचन हॉल स्विमिंगपुल नारळाची वाडी पार्किंगसह (एकूण क्षेत्र १० गुंठे) संपर्क– ८३२९१७५७९१ ठिकाण आक्षी (रायवाडी)

■ अलिबागमध्ये नामांकित टू व्हीलर शोरुममध्ये अनुभवी मॅकेनिक पाहिजे व शोरुममध्ये काम करायला बाई पाहिजे. (संपर्क : ७५१७७०१८५८/९८२२०६३१६६)

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२९ डिसेंबर**

१) श्री. भवान्या रामचंद्र पावशे
नवगाव, अलिबाग, २९-१२-१९३८
२) श्री. अशोककुमार चिंतामण वैशंपायन
अलिबाग, २९-१२-१९४९
३) श्रीम. नमिता नथुराम तळकर
अलिबाग, २९-१२-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**ओमकार अजित पाटील, वाढदिवस, पेझारी, अलिबाग**

# जमिनीला एकरी पन्नास कोटी भाव द्या

**। चाणजे । वार्ताहर ।**

राज्य सरकारने तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी ठाणे जिल्ह्यातील बेलापूर विभागातील तसेच पनवेल, उरण तालुक्यातील ९५ गावांतील शेतकऱ्यांच्या भाताचे विपुल पीक येणाऱ्या जमिनी एकरी २७ हजार रुपये किमत देऊन कवडीमोल दराने घेतल्या आहेत. आम्हा भुमीपुत्रांचा विरोध हा विकासाला नाही तर विकासाच्या नावाखाली भूमीपुत्रांना बेरोजगार करून त्यांना देशोधडीला लावू त्यांचे येथील अस्तित्वच नष्ट करणे या गोष्टींना विरोध आहे. तरी, आमच्या जमिनींना एकरी पन्नास कोटी भाव देण्यात यावा, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य प्रकाश म्हात्रे यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

ते पुढे म्हणाले की, येथील आगरी, कोळी, कराडी या भूमीपुत्रांना देशोधडीला लावून त्यांचे येंथील अस्तित्वच धोक्यात आणले आहे आणि आता तर खोपटा नवेनगर व कर्नाळा-साई-चिरनेर या नावाने तिसरी मुंबई निर्माण करून येथील भूमीपुत्रांना देशोधडीला लावून त्यांचे येथील अस्तित्वच नष्ट होण्याची भीती शेकापचे जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य प्रकाश म्हात्रे यांनी व्यक्त केली आहे. आम्हा भूमीपुत्रांचा विरोध हा विकासाला नाही तर विकासाच्या नावाखाली भूमीपुत्रांना बेरोजगार करून त्यांना देशोधडीला लावू त्यांचे येथील अस्तित्वच नष्ट करणे या गोष्टींना विरोध आहे.

### काय आहेत मागण्या?

**शासनाने नियोजित प्रकल्पासाठी येथील भूमीपुत्रांच्या जमिनी संपादन करताना एक एकराला ५० कोटी रुपये किंमत द्यावी. साडेबारा टक्के विकसित भूखंड द्यावा, शेतकरी असल्याचा दाखला द्यावा, प्रकल्पबाधित प्रत्येकास नोकरी, रोजगार द्यावा, पुढे वारसांहक्काने एकास नोकरी द्यावी, प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांचे सुयोग्य असे प्रकल्प परिसरातच पुनर्वसन, भूमीहीन शेतकरी, शेतमजूर यांना विकसित भूखंड, रोजगार व पुनर्वसन करणे, शेतकरी वंशपरंपरेने पिकवित असलेल्या जमिनी सरकार संपादित करीत असेल तर शेतकरी भूमीपुत्रांचे जीवन उद्ध्वस्त होणार नाही याची दक्षता मायबाप सरकारने घ्यावी, अशी मागणी प्रकाश म्हात्रे यांनी सरकारकडे केली आहे.**

# आगरी-कोळी बांधवांनी घेतले वेताळ देवाचे दर्शन



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

दरवर्षी गव्हाण येथे आगरी, कोळी बांधव खांदेरी किल्ल्यावर वेताळ देवाचे दर्शन घेत असतात. यावर्षीही त्यांनी बुधवारी (दि. २५) मोठ्या भक्तीभावाने उरण मोरा येथून समुद्रमार्गे बोटीने जाऊन खंदेरी या किल्ल्यावरील वेताळ देवाचे दर्शन घेतले. भक्तिमय वातावरणात आणि कोळीगीतांच्या तालावर वाजत गाजत बँड पथक घेऊन वेताळ देवाला साकडं घालण्यात आले. येथील आख्यायिकांमध्ये सांगण्यात येते की, वेताळ देवाची शिला दरवर्षी इंचा-इंचाने वाढत असते. वेताळदेव म्हणजे शिवशंकराचा अवतार मानले जातात. रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, कामगार नेते महेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनानुसार वेताळ देवाचे भक्त मनोज फडकर हे कार्यक्रमाचे नियोजन करतात. सर्वांना सुखशांती लाभो व सर्वांची भरभराट होऊन इतरांना मदत करण्याची सद्बुद्धी द्यावी, अशी प्रार्थना वेताळदेवाला यावेळी महेंद्र घरत यांनी केली. यावेळी एमजी ग्रुपचे किरीट पाटील, वैभव पाटील, प्रशांत पाटील, मुरलीधर ठाकूर, लक्ष्मण ठाकूर, योगेश रसाळ, अजित ठाकूर, राजेंद्र भगत, प्रित म्हात्रे, निखिल गावंड, मेहबूब लदाफ आदी मान्यवर उपस्थित होते.

# जगन्नाथ साळुंखेंना समाजभूषण पुरस्कार




**। महाड । वार्ताहर ।**

लोकजागर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते आणि बालकल्याण समितीचे दंडाधिकारी न्यायपीठ अध्यक्ष जगन्नाथ साळुंखे यांना नुकताच पंढरपूर येथील संस्थेचा समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाडमध्ये लोकजागर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आणि शासनाच्या बालकल्याण समितीचे रायगड जिल्ह्याचे दंडाधिकारी न्यायपीठ अध्यक्ष जगन्नाथ साळुंखे यांना पंढरपूर येथील स्वर्गीय हरिश्चंद्र फाऊंडेशनचा यावर्षीचा समाज भूषण पुरस्कार नुकता जाहीर करण्यात आला होता. या पुरस्काराचे वितरण १५ डिसेंबर रोजी पंढरपूर येथे करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. जगन्नाथ साळुंखे हे महाड तालुक्यातील विविध सामाजिक संस्थांची कार्यरत होते. त्यांनी लोकजागर सामाजिक संस्था आपण करून शासकीय योजना, तसेच उपक्रम ग्रामीण भागामध्ये राबवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शासानाच्या कृषी विभागात विभाग स्तरावर व पाणी पुरवठा व स्वच्छता अभियान, आणि आता शासनाच्या रायगड जिल्हा बालकल्याण समिती दंडाधिकारी न्यायपीठ अध्यक्ष म्हणून महिला व बालविकास क्षेत्रात काम करत आहेत.

# प्रा. राजेंद्र जाधवांची निवड

**। खरोश । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे (बालभारती) येथे प्रा. राजेंद्र जाधव याची इतिहास अभ्यास मंडळ समिती सदस्य म्हणून नुकतीच निवड करण्यात आली आहे.



प्रा. राजेंद्र जाधव हे रायगड जिल्ह्यातील पेण येथे एज्युकेशन सोसायटीच्या प्रायव्हेट हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांची महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण पुणे येथे इतिहास अभ्यास मंडळ समितीवर नियुक्ती झाल्याने पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, ॲड. बापूसाहेब नेने संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य सहकारी, मित्र परिवाराकडून व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावतीने अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

प्रा.जाधव यांची एनसीईआरटी भोपाळ, सीसीआरटी (सांस्कृतिक स्रोत एवं प्रशिक्षण केंद्र दिल्ली येथे २१ दिवस) येथील प्रशिक्षण पूर्ण केले आहेत. तसेच एससीईआरटीच्या प्रश्न पेढी निर्मिती व आनंददायी शनिवार उपक्रमासाठी राज्यस्तरीयस सुलभक म्हणून कार्य केले आहे.

# माथेरानमधील घोडे आणि पर्यावरणाच्या अभ्यासासाठी समिती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी झाडाला घोडे बांधण्यात येतात आणि त्या घोड्यांचे मलमूत्र यामुळे ती झाडे सुकून जातात आणि नंतर नामशेष होतात. ही बाब गेली अनेक वर्षे पाहणारे माथेरानकर यांनी माथेरान मध्ये घोड्यांमुळे जंगलाचा ऱ्हास होत असल्याचा दावा करणारी याचिका राष्ट्रीय हरित लवादमध्ये दाखल केली आहे. या याचिकेची सुनावणी सध्या सुरू असून, राष्ट्रीय हरित लवादाकडून या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली आहे.



माथेरान या ५४ चौरस किलोमीटरमध्ये वसलेल्या भागात ७० टक्के भाग हा जंगलाने व्यापला आहे. ब्रिटिशांनी शोधलेल्या माथेरानमध्ये घोडा हे वाहतुकीचे साधन होते. मात्र, त्यानंतर याच घोड्यांमुळे माथेरानमधील जंगलाचा ऱ्हास होत असल्याचे दिसून आले आहे.एका झाडाखाली सतत बांधून ठेवलेल्या घोड्यांमुळे ते झाड सुकून गेल्याची तक्रार करण्यात आली आहे. घोड्यांच्या मलमूत्र यांच्यामुळे माथेरान मधील अनेक झाडे कोलमडून पडली असल्याचे आढलून आली आहेत. त्यामुळे माथेरान मधील नागरिक सुनील शिंदे आणि केतन रामाणे यांनी राष्ट्रीय हरित लवादमध्ये माथेरानमधील घोडे हे पर्यावरणाचा ऱ्हास करण्यास कारणीभूत असल्याची याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेची सुनावणी घेण्यात आली, त्यावेळी राज्य पर्यावरण नियंत्रण मंडळ यांनी आपली भूमिका मांडली. त्यात एमपीसीबीकडून ॲड. मानसी गर्ग, ॲड. पूजा नातू यांनी तर राज्य पर्यावरण विभाग यांच्याकडून ॲड. शुभम राठोड, ॲड. राहुल गर्ग यांनी राष्ट्रीय हरित लवादासमोर आपली भूमिका मांडली. तर याचिका करणारे सुनील शिंदे, केतन रामाणे यांच्याकडून ॲड. तुषार कुमार यांनी आपली भूमिका मांडली.

राज्य सरकारचे प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरण विभाग यांनी माथेरानमधील घोड्यांविषयी राष्ट्रीय हरित लवादमध्ये आपली भूमिका मांडली. या सुनावणीत घोड्यांमुळे माथेरानच्या पर्यावरणाचा होणार ऱ्हास थांबवण्यासाठी विविध उपाययोजना सुचविण्यात आल्या. राष्ट्रीय हरित लवाद यांच्याकडून नेमण्यात आलेल्या संयुक्त समितीने पाच संस्था यांचा सहभाग असणार आहे. या संस्था संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ लोणेरे रायगड, फर्ग्युसन महाविद्यालय पुणे, वीर जिजामाता संस्था मुंबई, सावित्रीबाई फुले पुणे आणि भारती विद्यापीठ पुणे यांच्यासोबत सविस्तर चर्चा केल्यानंतर आपला अहवाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठाकडे सादर करणार आहे. एप्रिल २०२५ मध्ये राष्ट्रीय हरित लवाद पुढील सुनावणी घेणार आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य २९ डिसेंबर २०२४ ते ४ जानेवारी २०२५

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## आर्थिक लाभाची शक्यता

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या लक्ष्यांकाप्रती आपण वचनबद्ध असल्याने प्रत्येक काम आपण शिस्तबद्ध पद्धतीने व एकाग्रतेने पूर्ण कराल. या आठवड्यात व्यावसायिक आघाडीवर शत्रूंपासून सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. उत्तरार्धात आपणास आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या सुरुवातीस आपण जर एखाद्याच्या सहकार्याची अपेक्षा बाळगलीत, तर ती पूर्णत्वास जाईल. आपले लक्ष बहुतांशी आपल्या कामाच्या गुणवत्तेवर केंद्रित ठेवल्याने आपण स्पर्धात्मक वातावरणात टिकाव धरू शकाल. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पूर्वार्ध अनुकूल आहे. सामान्य अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उत्तरार्ध जास्त अनुकूल आहे. या आठवड्यात कुटुंबीय व प्रिय व्यक्तीशी असलेल्या आपल्या संबंधांना आपण अधिक चांगल्या प्रकारे समजू शकाल. **महिलांना-** समाधानामुळे प्रिय व्यक्ती प्रती असलेली भावना अधिक तीव्र होईल. आध्यात्मिक मार्गासाठीसुद्धा हा आठवडा अनुकूल आहे. प्रणयी जीवनासाठीसुद्धा हा आठवडा अनुकूल असून, उत्तरार्धात आपणास प्रेमालाप करण्याची संधी लाभेल. **शुभ दिनांक** - २९,३०.

## भागिदाराचे सहकार्य लाभेल

**वृषभ :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवातीस आपणास आत्मपरीक्षण करण्याची इच्छा होईल. त्यामुळे आपण इतरांपासून दूर राहून स्वतःच्याच जगात वावरत बसाल. अशा परिस्थितीत आपण व्यवसाय किंवा कुटुंबास कमी महत्त्व द्याल. मात्र, आठवड्याच्या मध्यापासून आपण पुन्हा सांसारिक बाबतीत सक्रिय व्हाल. त्यामुळे दूरवर राहात असणाऱ्या आप्तांशी संपर्क वाढतील. कोणतेही नवीन धाडस किंवा सुरुवात करण्यात येणाऱ्या अडचणी आता दूर होऊ लागतील. भागीदाराच्या सहकार्याने प्राप्तीत वाढ करू शकाल. सुरुवातीच्या दोन दिवसात विद्यार्थ्यांना अभ्यासाचा कंटाळा येऊ शकतो, मात्र त्यानंतर ग्रहांच्या प्राबल्यामुळे अभ्यास चांगला होईल. ह्या आठवड्यात व्यक्तिगत जीवनात व संबंधात पारदर्शीपणा ठेवल्यास त्यातील आत्मीयता जाणवून संबंध अधिक परिपक्व होतील. **महिलांना-** सुरुवातीच्या दोन दिवसात आपणास एकटे राहण्यास आवडले तरी एकंदरीत ह्या आठवड्यात आपण संबंध उत्तम प्रकारे टिकवू शकाल. आठवड्याच्या सुरुवातीस आरोग्याची काळजी घ्यावी. कोणत्याही लहानशा समस्येकडे दुर्लक्ष करू नये. **शुभ दिनांक** -३०,३१.

## नवीन व्यवसायासाठी अनुकूल

**मिथुन :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवातीस आपल्या व्यक्तिगत जीवनात येणारी वादळे टाळण्यासाठी संबंधांत अधिक जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न करावा लागेल. आठवड्याच्या मध्यास आपल्यात सुस्ती व आळस राहिल्याने आपल्या शक्तीचे स्तर खालावून प्रकृतीत सतत चढ-उतार होण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात आपण कठीण परिस्थितीतून बाहेर पडू शकाल. आपली व्यावसायिक व्यूहरचना आखून आपण मार्गक्रमण कराल. कदाचित व्यावसायिक हेतूने अनेक लोकांशी सतत संपर्क व बैठका घेण्यासाठीसुद्धा सज्ज राहावे लागेल. आपण नवीन उत्पादन किंवा सेवा सुरु करण्याचा विचार करत असाल तर त्यासाठी उत्तरार्ध अनुकूल आहे. आपण आजवर साधलेल्या संपर्कांचा आता फायदा होऊ लागेल. विद्यार्थ्यांसाठी आठवड्याचे सुरुवातीचे व अखेरचे दिवस अनुकूल आहेत.

**महिलांना-** प्रिय व्यक्ती किंवा वैवाहिक जोडीदाराकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यास त्यांची वास्तविक स्थिती समजून घेऊन त्याचे निराकरण करण्यासाठी मदतरूप होण्याचा प्रयत्न करावा. असे केल्याने आपल्यात दीर्घकाळासाठी जवळीक वाढेल. घरात पाहुण्यांची, माहेरच्या माणसांची रेलचेल वाढेल, त्यामुळे आपण आनंदी राहाल. **शुभ दिनांक** -०१,०२.

## जोडीदाराचा सहवास लाभेल

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवातीस मानसिक तणावामुळे आपल्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. आपण पौष्टिक आहारच घ्यावा. यादरम्यान स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी योग्य जीवनशैलीचे अनुसरण करणे अत्यंत गरजेचे आहे. व्यावसायिक आघाडीवरसुद्धा अतिरिक्त काम करण्याची तयारी ठेवावी लागेल. कामाच्या ठिकाणी आंतरिक लाथाळ्यांपासून बचाव करण्यासाठी आपणास अधिक व्यावसायिक व्हावे लागेल. आठवड्याच्या मध्यास वैवाहिक जोडीदाराच्या किंवा प्रिय व्यक्तीच्या सहवासात वेळ घालवताना आपल्या जीवनातील उत्साह व उमेद वाढेल. उत्तरार्धात आपला अंतरात्मा आपणास दैनंदिन कार्यापासून दूर राहण्यास प्रोत्साहित करेल. त्यामुळे आपल्या आध्यात्मिक ज्ञानाच्या कक्षा रुंदावतील.

**महिलांना-** आपल्या वैवाहिक जोडीदाराची नापसंती किंवा नाराजी आपण समजून घेऊन त्याचे योग्य निराकरण करून त्याचे किंवा तिचे हृदय जिंकू शकाल. ह्या आठवड्यात प्रणयी जीवनात संभाव्य गैरसमज टाळण्यासाठी आपल्या प्रिय व्यक्तीशी वार्तालाप करताना शब्दांची निवड काळजीपूर्वक करावी. **शुभ दिनांक** -०३,०४.

## विवाहेच्छुकांना जोडीदार मिळेल

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आठवड्याच्या सुरुवातीस आपण कुटुंबाशी संबंधित बाबींकडे लक्ष द्याल, परंतु कौटुंबिक कार्यात विलंब होऊ शकतो. वाणी संयमित ठेवल्यास वाणीतील माधुर्यामुळे आपण कोणत्याही व्यक्तीस आपले म्हणणे पटवून देऊ शकाल. आर्थिक बाबींवर आपण अधिक लक्ष द्याल. आठवड्याच्या मध्यास वैवाहिक जोडीदार किंवा प्रिय व्यक्तीशी आपण जवळीक साधू शकाल. विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात व्यावसायिक आघाडीवर आपली सक्रियता वाढेल. नोकरी करणाऱ्या व्यक्तींनी उत्साहपूर्वक काम केल्यास त्यांना त्याचे यथोचित फळ मिळू शकेल. पदोन्नतीचा मार्ग मोकळा होईल तसेच नवीन संधीसुद्धा प्राप्त होण्याची शक्यता आहे. त्यासाठी योग्य प्रयत्न करा. **महिलांना-** आठवड्याच्या अखेरीस प्रलंबित कामे पूर्णत्वास जातील. वैयक्तिक संबंधाच्या बाबतीत आपण अतिभावनाशील व्हाल. विद्यार्थी आठवड्याच्या मध्यापर्यंत अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकतील. त्यानंतर त्यांना अभ्यासात काही अडचणी येतील. उत्तरार्धात आरोग्याची विशेष काळजी घ्यावी. **शुभ दिनांक** -०१,०४

## व्यापारास नवी दिशा सापडेल

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात मन स्थिर करूनसुद्धा उत्तरार्धात काही समस्या निर्माण झाल्याने आपले मन बेचैन व व्याकुळ होईल. त्यामुळे मानसिक अस्वस्थता जाणवेल. आठवड्याच्या अखेरीस शरीराला ताजेतवाने ठेवून शरीर निरोगी ठेवू शकाल. तरीही आपले आरोग्य मध्यम राहील. आपणास आहारात योग्य आहारासाठी आग्रही राहावे लागेल. तेलकट, तूपट, तिखट यापासून लांब राहा. डोकेदुखी, शारीरिक ताण इत्यादी समस्या संभवतात. व्यावसायिक कार्यातसुद्धा लाभ होण्याची अपेक्षा आपण यावेळी बाळगू शकता. त्या दिशेने प्रयत्न करा. सेवा तसेच धर्मादाय कार्यात अधिक खर्च करून आपण समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न कराल. व्यापाऱ्यांची वसुली होऊ शकेल. व्यापारास नवीन दिशा सापडेल. भागीदारी कार्यात भागीदार व्यक्ती घाई किंवा रागराग करेल तेव्हा शांत राहावे. **महिलांना-** उत्तरार्धात विवाहेच्छुक व्यक्ती जोडीदार निवडीचा निर्णय घेऊ शकतील. कोलेस्ट्रोलशी संबंधीत समस्या संभवत असल्याने आहाराकडे विशेष लक्ष द्यावे. आरोग्यविषयक समस्या टाळण्यासाठी तब्येतीबाबत हलगर्जीपणा करू नका, हा सल्ला देण्यात येत आहे. **शुभ दिनांक** -२९,३१.

## कौटुंबिक वातावरणात सलोखा

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवातीस कौटुंबिक वातावरणात सलोखा राहील. घरात एखादी नवीन वस्तू आणली जाईल. वडीलधारी व वरिष्ठ यांच्याशी वाणी व वागणुकीत सौम्यपणा राखावा व शक्य तितका त्यांचा आदर करावा. सध्या शासकीय व कायदेशीर खर्च करण्याची तयारीसुद्धा ठेवावी लागेल. नकारात्मक विचारांपासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आपल्या हातून एखादे धार्मिक किंवा पुण्य कार्य होईल. प्रणयी जीवनात आपण गर्क राहाल. समाधानी वृत्ती बाळगल्यास अनेक संघर्षातून बाहेर पडू शकाल. नोकरी-व्यवसायात स्पर्धेस सामोरे जावे लागले. तरी आपल्या कार्यनिष्ठेमुळे आपण त्यात यशस्वी होऊ शकाल. उत्तरार्धात प्रिय व्यक्तीच्या संपर्काने आपण अधिक प्रसन्न व्हाल. मिळकत वाढल्याने हिशोबीपणाने दीर्घकालीन आर्थिक नियोजनसुद्धा करू शकाल. आठवड्याच्या मध्यास सामाजिक व सार्वजनिक प्रसिद्धी मिळेल. **महिलांना-** कौटुंबिक व वैवाहिक जीवनात सुख, संतोष व रोमँटिक पराकाष्ठेचा अनुभव येईल. आठवड्याच्या मधल्या दिवसात आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागेल. **शुभ दिनांक** -३०,०१.

## आत्मविश्वास द्विगुणित होईल

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात चांगली कार्ये, आवेग व भरपूर जोमाने सामाजिक जबाबदाऱ्या किंवा वचने पाळावी लागतील. आपण ज्या जोमाने कार्य करून पुढे जाऊ इच्छिता, त्यात इतरांचे सहकार्य मिळाल्याने आपला आत्मविश्वास द्विगुणित होईल. व्यावसायिक कार्याशी संबंधित सरकारीबाबीत यश प्राप्ती होईल. कमी प्रयत्नात चांगला आर्थिक लाभ होऊ शकेल. आपली कामे आयोजनानुसार पूर्ण होऊन आपणास अपेक्षित लाभसुद्धा होईल. प्रतिस्पर्धी कोणत्याही क्षणी आपल्यावर चढाई करण्याची शक्यता असल्याने आपण सावध राहावे. वैवाहिक जीवनात प्रेमाची उत्कटता अनुभवता येईल. स्वादिष्ट भोजन, नवीन वस्त्रांची खरेदी, भिन्नलिंगी व्यक्तींचा संपर्क ह्यामुळे आपण रोमांचित व्हाल. भिन्नलिंगी व्यक्तींशी आधुनिक साधनांच्या मदतीने वार्तालाप संभवतो. **महिलांना-** स्त्री मित्रांची मैत्री लाभदायी ठरेल. आपल्या पपाल्याकडे लक्ष द्यावे लागेल. बाहेर फिरण्यासाठी केलेले नियोजन नंतर उपयोगी पडणार आहे योगासने व ध्यान-धारणा करून आरोग्य चांगले राहण्यास मदत होऊ शकेल. **शुभ दिनांक** - ३१,०२.

## नवीन कार्यासाठी उत्तम काळ

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवातीस आपणास एकटे राहण्याची इच्छा होईल. नवीन कार्याची सुरुवात करण्यास किंवा नवीन निर्णय घेण्यास पूर्वार्ध अनुकूल नाही. पोटाशी संबंधित विकारांमुळे शारीरिक अस्वस्थता जाणवेल. मनात काही नकारात्मक विचारसुद्धा येतील. असे असले तरी आठवड्याच्या मध्यास ग्रहांच्या अनुकूल परिवर्तनामुळे आपल्या जीवनात नवीन आशावाद जागृत होऊ शकेल. आपण नवीन विचाराने व उत्साहाने सुरुवात करू शकाल. स्नेहीजन व मित्रांचे सहकार्य मिळून त्यांच्याशी असलेल्या संबंधातील माधुर्यसुद्धा टिकून राहील. आठवड्याच्या मध्यास आजारी व्यक्तींना नवीन उपचारांचा फायदा होऊ शकेल. या आठवड्याच्या सुरुवातीस खर्च करण्यास सज्ज राहावे लागेल. पहिल्या दिवसापासूनच विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करून त्यानुसार पुढे जावे लागेल. **महिलांना-** प्रिय व्यक्ती किंवा वैवाहिक जोडीदाराशी सुरुवातीस थोडा दुरावा निर्माण झाला तरी आठवड्याच्या मध्यास जवळीक वाढेल. ज्यांचे कोणाशी संबंध नसतील त्यांची एखाद्या योग्य व्यक्तीशी ओळख होण्याची शक्यता नाकारता येत नाही. **शुभ दिनांक** - ०१,०३.

## सार्वजनिक क्षेत्रात लाभ

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवात काहीशी प्रतिकूल आहे. विशेषतः आपण कोणत्याही बाबतीत अति घाई किंवा अतिशयोक्ती करू नये, अन्यथा आपले विचार किंवा शब्दांचे चुकीचे अर्थ निघण्याची किंवा नुकसानदायी निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. सुरुवातीस आपण कोणतेही नवीन काम करण्याऐवजी धीराने व शांत चित्ताने जैसे थे स्थिती टिकवून ठेवणे हितावह होईल. आठवड्याच्या मध्यापासून आपण सामाजिक व सार्वजनिक जीवनात कौतुकास पात्र व्हाल. आपणास सार्वजनिक क्षेत्रात चांगला लाभ होईल. आपण सार्वजनिक सेवेतसुद्धा स्वारस्य दाखवाल. मनमोहक वस्तूंची खरेदी किंवा मनोरंजनासाठी आपण पैसे खर्च कराल. नोकरी-व्यवसायात नवीन संधी मिळेल. विविध क्षेत्रात आपण केलेल्या कष्टांचे फळ प्राप्त झाल्याने आपल्या आर्थिक सामर्थ्यात व कामातील आत्मविश्वासात वाढ होईल.

**महिलांना-** आठवड्याच्या मध्यापासून प्रिय व्यक्तीशी संबंधात सुधारणा होऊन आपणास सौख्य व आनंदाची प्राप्ती होईल. भावनाशील संबंधात आपण न्हाऊन जाल. सुरुवातीचे दोन दिवस वगळता बहुतांशी आपले आरोग्य उत्तम राहील. **शुभ दिनांक** -०२,०४

## समाजात मान-सन्मान वाढेल

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही कुटुंबातील बऱ्याच जबाबदाऱ्यांना पूर्ण कराल ज्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेत वृद्धी होईल तसेच तुमचा समाजात ही मान-सन्मान ही वाढेल आणि तुम्ही एक प्रसिद्ध व्यक्ती म्हटले जाल. या आठवड्याच्या सुरुवातीपासूनच आपण व्यावसायिक व व्यक्तिगत जीवनावर अधिक लक्ष केंद्रित करू शकाल. त्यामुळे कामाच्या ठिकाणी आपण प्रतिस्पर्ध्यांवर मात करू शकाल. मोहाच्या अतिरेकाने नवीन समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याने अल्पकालीन योजनेत परिस्थितीचा अभ्यास करून पाऊल उचलावे. अतिआत्मविश्वास समस्यांना कारणीभूत ठरू शकतो हे लक्षात ठेवावे. दैनंदिन प्राप्तीत फायदा होऊन त्यात वाढ संभवते. जन्मस्थग्रह प्रबळ असल्यास अचानक धनलाभ तसेच विविध प्रकारचे लाभ संभवतात. **महिलांना-** घरात धार्मिक कार्ये होतील. विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. कुटुंबियांशी कटुता निर्माण झाल्याने मनाची उदासीनता वाढेल. वडीलधाऱ्यांच्या आशीर्वादाने आपणास कार्यात यश मिळेल, तसेच कोणत्याही कार्यात त्यांचे उत्तम मार्गदर्शनसुद्धा मिळेल. त्याचा फायदा होईल. **शुभ दिनांक** - २९,३१.

## व्यवसायामध्ये लाभाचे योग

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात व्यावसायिक आघाडीवर प्रगती झाल्याने आपल्या सामाजिक प्रतिमेत मोठी सुधारणा होईल. आपण सार्वजनिक क्षेत्रातील कार्यात सहभागी व्हाल व तेथे आपल्या कामाची प्रशंसासुद्धा होईल. उत्तम वाहनसौख्य लाभेल. आपले व्यक्तिगत जीवन व संबंध प्रबळ करण्यासाठी आवश्यक तितका खर्च करणे हितावह होईल. पूर्वार्धात विद्यार्थ्यांचा अभ्यास उत्तम झाला तरी उत्तरार्धात वैचारिक चांचल्यामुळे अभ्यासातील एकाग्रता कमी होण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या सुरुवातीस इतरांशी संपर्क वाढतील. तंदुरुस्त राहण्यासाठी सभोवतालच्या वातावरणात स्वच्छता ठेवून अशुद्ध तत्त्वांपासून दूर राहून आरोग्याची काळजी घेता येईल. मनात येणाऱ्या वाईट विचारांना दूर सारा.

**महिलांना-** हा आठवडा वैवाहिक जीवनाचा आनंद उपभोगण्यासाठी उत्तम आहे. जोडीदाराच्या सहवासात सुखद क्षणांचा अनुभव घेऊ शकाल. आठवड्याच्या मध्यास आपणास कुटुंबियांचे व नातेवाईकांचे सहकार्यसुद्धा मिळू शकेल. वैवाहिक जीवनात आपल्या जोडीदाराबरोबर शांतीपूर्वक राहण्याचे प्रयत्न करा. **शुभ दिनांक** -३०,०४.

# नव वर्ष, नवी अनुभूती!






**मृण्मयी देशपांडे**

आपल्यापैकी प्रत्येकालाच नवीन वर्षाबाबत कुतूहल असते. तसे औत्सुक्य मलाही आहे. मागील काही काळाप्रमाणे येणारे वर्षही अनेक नवनवीन प्रोजेक्ट्सने भरलेले, फॉर्मवरील आयुष्यात नवे रंग दाखवणारे असेल, अशी आशा आहे. आज आमच्याच नव्हे, तर आपल्या सगळ्यांच्याच आयुष्याला प्रचंड वेग आला आहे. एक वर्ष कधी संपते आणि नवे कधी सुरू होते, याचा हिशेबही कधी कधी लागेनासा होतो. त्यामुळेच या संमिश्र भावनेतून सरत्या वर्षाला निरोप दिला जात आहे. खरे तर, २०२४ भरात आल्यासारखे वाटतेय. पण आता २०२५ चे स्वागत करण्याची वेळ आली आहे. अर्थातच नवे वर्षही याच वेगाने पुढे सरकणार आहे. ऋतूबदलाचे एक चक्र अनुभवत आयुष्य पुढे सुरू राहणार आहे. तेव्हा या वर्षाचे आणि आयुष्याचे मोकळ्या मनाने स्वागत करु या.

सध्याच्या काळात पर्यावरणविषयक प्रश्न अतिशय गुंतागुंतीचे झाले असून संपूर्ण मानवजातीनेच आता माणूस म्हणून आपण कुठे आहोत, याचा विचार करण्याची गरज जाणवू लागली आहे. हे लक्षात घेता २०२५ मध्ये डोळे उघडून आपल्या प्रांत, राज्य वा देशाकडेच नव्हे तर संपूर्ण जगाकडे बघणे गरजेचे आहे, असे वाटते. शेवटी हद्दी माणसाने ठरवलेल्या असतात, निसर्गाने नव्हे. त्यामुळेच या हद्दींच्या पलिकडे जात होणारा विचारच भविष्याला आकार देणारा ठरणार आहे. चराचरातील एक प्रजाती म्हणून स्वत:ला शोधण्याची गरज मला प्रकर्षाने जाणवते. कारण, हे केले नाही तर आपण आपल्या प्रजातीच्या नाशाला कारणीभूत ठरु. वेळीच पावले उचलली नाहीत तर आज ना उद्या हे घडणारच आहे. असेच

निष्काळजीपणाने जगत राहिलो तर पुढील दहा वर्षांमध्येच आपल्याला अनेक धोकादायक बदलांना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळेच एक वर्ष संपून नवे वर्ष सुरू होताना कधी कधी आनंदापेक्षा दडपणाचे प्रमाणच वाढल्याचा अनुभव सध्या येत आहे. मात्र या भीतीने गलितगात्र न होता, धीर न सोडता नव्या दमाने, नव्या विचारांनीशी दिवसाची सुरूवात करायला हवी, कारण निराश होत जगणे हे कधीच चांगले जगणे होत नाही. तेव्हा चांगले जगायचे तर आपल्याला आशावादी रहायलाच हवे. प्रत्येक वर्षाची सुरूवात मनात आशेचा अंकुर ठेवूनच झाली पाहिजे. तरच आपण शहाणे होऊ आणि वाढलेल्या बुद्ध्यांकांचा चांगल्या प्रकारे उपयोग करुन घेऊ शकू. आधीपासून माणूस हुशार आहेच. पण आता तो शहाणा होणार का, हा खरा प्रश्न आहे. येत्या वर्षात याचे उत्तर शोधावे लागेल.

गेली काही वर्षे आम्ही निसर्गाचा निकटचा सहवास अनुभवत आहोत. नैसर्गिक शेतीमध्ये अनेक नवीन प्रयोग करत बरेच काही शिकत आहोत. यानिमित्ताने वेगवेगळ्या लोकांना भेटत आहोत. त्यातच एका मान्यवरांचे एक वाक्य मनाला भावले. गप्पा मारताना ते म्हणाले, आपण आपले तर घेतच आहोत, पण पुढच्या पिढीचेही आपणच संपवत आहोत. निसर्गामध्ये वावरत असताना हे सत्य अधिक तीव्रतेने आणि प्रकर्षाने जाणवत आहे. खरे तर निसर्गाच्या जितक्या जवळ जाऊ, तितक्या तुमच्या जाणीवा प्रगल्भ होतात, प्रखर होतात आणि तुम्ही अधिक चांगल्या प्रकारे काम करु शकता. त्यामुळे येत्या वर्षात अनेकांनी निसर्गाशी सोयरेपण जपण्याची गरज आहे, असे मला वाटते. त्या दृष्टीने आम्ही एक पाऊल उचलले आहेत. आता मागोमाग काही लोक येत आहेत. अलीकडेच आम्ही फार्मवर काही कार्यशाळा सुरू केल्या आहेत. त्यातून काही समजून घेऊन आजूबाजूचे शेतकरीही आपल्या शेतजमिनींकडे बघत आहेत. त्यांना शेतीमध्ये नवे प्रयोग करायचे आहेत. सेंद्रिय शेतीतले नवे काही जाणून घ्यायचे आहे. रासायनिक खते न वापरता विषमुक्त शेती करण्याकडे लोकांचा कल वाढताना दिसतोय. आमच्याकडे बघून काही लोकांना असे करावेसे वाटणे हीदेखील एक मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. शेवटी आम्ही स्वार्थासाठी म्हणजेच स्वच्छ हवा, चांगले आणि सकस अन्न, पुरेसा सूर्यप्रकाश मिळवण्यासाठी, पाळलेल्या कुत्र्यांना चांगली आणि पुरेशी जागा देण्यासाठी हे पाऊल उचलले असले तरी यातून काहींना नवी दृष्टी मिळणे ही सुखावणारी बाब आहे. या पार्श्वभूमीवर लोकांपुढे चांगल्या गोष्टींचा आदर्श ठेवणे, त्यांना चांगल्या गोष्टींकडे वळवणे ही मला जबाबदारी वाटते. ती पार पाडली जात असल्याचा निखळ आनंद सरत्या वर्षाने आम्हाला दिला आहे आणि नवे वर्षही तो देत राहील याची खात्री आहे.

**सध्याच्या काळात पर्यावरणविषयक प्रश्न अतिशय गुंतागुंतीचे झाले असून, संपूर्ण मानवजातीनेच माणूस म्हणून आपण कुठे आहोत, याचा विचार करण्याची गरज जाणवू लागली आहे. हे लक्षात घेता २०२५ मध्ये डोळे उघडून आपला प्रांत, राज्य वा देशाकडेच नव्हे, तर संपूर्ण जगाकडे बघणे गरजेचे आहे, असे मला वाटते. शेवटी हद्दी माणसाने ठरवलेल्या असतात, निसर्गाने नव्हे. या समेवर नववर्षाचे स्वागत करु या...**

आपल्या देशामध्ये अगदी ६० वर्षांपूर्वीदेखील विषमुक्त शेती होती. घरोघरी हीच पद्धत अनुसरली जायचे. मात्र, काळाच्या ओघात बरेच काही बदलले आणि बिघडले. ते सगळे पूर्ववत करणे आमच्या एकट्याच्या प्रयत्नाने साध्य होणारे काम नाही. पण किमान आमच्या कामाने समाजात जागृती निर्माण झाली आणि काही लोक प्रामाणिक प्रयत्न करुन चांगल्या दिशेकडे वळले तरी आपण बरेच काही मिळवू शकू, हा विचार सगळ्या कामामागे आहे. हे सगळे करत असताना माझ्या विचारांमध्ये झालेला बदलही प्रकर्षाने जाणवणारा आहे. अगदी आठ-दहा वर्षांपूर्वी पैसा असता तर एखादी आलिशान गाडी विकत घेण्यास मी प्राधान्य दिले असते. सगळी शक्ती पणाला लावली असती. पण आता पैसे असतानाही मला कोणत्याही ब्रँडच्या मागे धावण्याची इच्छा होत नाही. त्याऐवजी आणखी जमीन घेणे मला आवडेल.

आज जंगलातील काही भाग विकत घेऊन निगराणी करणे, संरक्षित करणे मला अधिक आवडेल, कारण ती खरी संपत्ती असल्याचे आता मला समजले आहेत. थोडक्यात, निसर्गाच्या सहवासात राहून प्रगल्भ झालेल्या जाणीवांचाच हा परिपाक आहे. चकमकत्या आणि दिखावू विश्वात कार्यरत असले तरी आता घर, गाडी, बंगला, नोकरचाकर आमचा प्राधान्यक्रम राहिलेला नाही वा त्याचे अप्रूपही राहिलेले नाही. शेवटी एखाद्याच्या जाणीवा प्रगल्भ होतात तेव्हाच तो शहाणा होऊ लागतो. हुशारी योग्य दिशेकडे वळते. असे असताना तुम्ही तुमच्याबरोबर समाजाचे भले केले नाही तरी किमान कुठला नाश तरी करत नाही. सध्या याच दिशेने आमचा प्रवास सुरू आहे आणि २०२५ मध्येही तो अशाच वेगाने सुरू राहील.

बाकीचे सगळे कामही सुरू आहेच. चित्रपटांमधून वेगवेगळ्या भूमिका साकारायला मिळत आहेत, याचा आनंद आहेच. पण प्रामाणिकपणे सांगायचे तर मी शेतीच्या कामात अधिक रमतीये. इकडची ओढ वाढते आहे. याचे एक कारण असेही आहे की पर्यावरणाच्या दृष्टीने जागतिक पटलावरील भयावह परिणाम पाहता येत्या काही काळात काम करायला माझे क्षेत्र असेल की नाही, हेदेखील मला माहिती नाही. कारण आता मर मर करुन मी चित्रपट करेन, नाटक करेन पण एखादी नैसर्गिक आपत्ती आली तर बंद पडणारे पहिले क्षेत्रही माझेच असेल. कोरोना काळाने हे दाखवून दिले आहे. विनाशाकडील आपली घोडदौड वेगाने सुरू आहे. म्हणूनच आता आपण आपल्या रक्षणासाठी काय करतोय, हा विचार अधिक प्रभावी होत आहे. नाच, गाणे, अभिनय, फिरणे याची पॅशन तर आधीपासून होतीच. ती आजही आहे. त्यापलिकडे मला काही येतही नाही आणि कधी काही वेगळे केलेही नाही. पण आता एकाच वेगाने आणि रेषेमध्ये या दोन्ही गोष्टी सुरू आहेत.

वर उल्लेख केल्याप्रमाणे आता विकत घेण्याच्या कोणत्याही गोष्टींची अभिलाशा राहिलेली नाही. गेल्या तीन वर्षांपासून अनेक गोष्टी माझ्या आयुष्यातून बाद झाल्या आहेत. सतत काही तरी विकत घ्यायचे, ड्रेस रिपीट करायचा नाही हे विचारही आता स्पर्श करत नाहीत. यशस्वी अभिनेत्री असूनही मला साधे राहणे जमते आहे. आता मी भारंभार कपडे विकत घेत नाही. ब्रँडेड चपलांचा अट्टहास तर कधीचाच संपला आहे. दोन-तीन हिल्स, दोन बूट आणि रोज वापरण्याच्या एका चपलांच्या जोडीवर मी राहू शकते, कारण या कशाचा आणि तुमच्या कामाचा एकमेकांशी काहीही संबंध नाही, हे आता समजले आहे. तुम्ही सेलिब्रिटी असाल तर समाजापुढे चांगले आदर्श उभे करण्यासाठी ही सर्वोत्तम वेळ आहे, असे माझे ठाम मत आहे. त्यामुळेच या नवीन कामात झोकून द्यायचे, घरात आधी कोणीच पायाखाली न घेतलेल्या वाटेवर प्रवास करण्याचे माझे प्रयत्न तर सुरू आहेत. २०२५ मध्ये ते अधिक यशस्वी होतील, या आशेनेच २०२४ ला निरोप देते. नव्या वर्षाचे स्वागत करते.

(शब्दांकन: स्वाती पेशवे)

# डॉ.पंजाबराव देशमुख : कर्तृत्ववान, विद्वान लोकनेता!



**डॉ. श्रीमंत कोकाटे**

ज्यांनी लंडनमध्ये जाऊन प्राच्यविद्येत पीएच.डी. मिळवली. तेथेच बॅरिस्टर झाले व मायभूमीत येऊन कृषी, शैक्षणिक, सामाजिक परिवर्तन, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रात धोरणात्मक कार्य केले. अशा जागतिक कीर्तीच्या डॉ.पंजाबराव देशमुख यांच्याबाबत बहुतांश महाराष्ट्रीयन मात्र अनभिज्ञ असावेत, ही बाब अत्यंत दुःखदायक आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख यांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील पापळ या गावी कदम देशमुख या घराण्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शामरावबापू तर आईचे नाव राधामाई होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातच म्हणजे पापळ येथे तर माध्यमिक शिक्षण कारंजा लाड आणि अमरावती येथे झाले. लहानपणापासून त्यांना शिक्षणाची प्रचंड आवड होती. बालपणापासून शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रचंड पगडा त्यांच्या मनावर होता. त्यामुळे अध्ययनाची चिकाटी त्यांनी सोडली नाही. त्यांचे उच्च शिक्षण पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात झाले. पुढे ते उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले. आपल्या मुलाने खूप शिकावे, ही त्यांच्या आईवडिलांची खूप इच्छा होती.

डॉ.पंजाबराव देशमुख हे जिद्दी, महत्त्वाकांक्षी होते. बालवयामध्ये त्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार ऐकले होते. ते पुढील शिक्षणासाठी लंडनला रवाना झाले. लंडन येथील केंब्रिज विद्यापीठात त्यांनी प्रवेश घेतला. तेथे त्यांनी ''वेदवाङ्मयातील धर्माचा उद्गम आणि विकास'' या विषयावरती पीएच.डी. मिळविली. ते नामवंत प्राच्यविद्याविद आहेत. त्याच वेळेस तेथील लिंकन इन या कॉलेजमध्ये बॅरिस्टरचे शिक्षण पूर्ण केले. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे संस्कृत आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते. तसेच त्यांचे हिंदी उत्तम होते. परदेशातील विद्यापीठात वेदावरती पीएच.डी.मिळवणारा पहिला भारतीय विद्वान म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख आहेत.

लंडन येथील शिक्षण पूर्ण करून मायदेशी परतल्यानंतर जुलै १९२५ पासून आपल्या सामाजिक कार्याला डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सुरुवात केली. प्रथम त्यांनी श्रद्धानंद वसतिगृहाची स्थापना केली. गोरगरीब मुला-मुलींना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांची खूप तळमळ होती. मराठा हायस्कूलमध्ये त्यांनी अध्यापनाचे काम केले. ते हाडाचे शिक्षकदेखील होते. मुलांचे शरीर तंदुरुस्त राहावे यासाठी त्यांनी व्यायाम शाळेची स्थापना केली. पुढे त्यांनी विदर्भातील सर्वात मोठ्या अशा श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज या संस्थेच्या अनेक शाळा, महाविद्यालये आहेत. या संस्थेतून लाखो विद्यार्थी शिक्षण घेऊन जगभरातील विविध क्षेत्रात कार्यरत आहेत.

गोरगरिबांना मोफत शिक्षण मिळावे यासाठी भाऊसाहेबांनी शिक्षण करात १८ पैसे वरून २७ पैसे अशी वाढ केली. भारतीय विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण घेता, यावे यासाठी त्यांनी लंडन येथे ''छत्रपती शिवाजी एज्युकेशन ट्रस्टची''ची स्थापना केली. कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज आणि हैदराबादचा निजाम यांच्या मदतीने त्यांनी विदर्भामध्ये शैक्षणिक क्षेत्रात वाढ केली. अमरावती येथे झालेल्या २६ व्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेत त्यांनी शिक्षणविषयक सडेतोड आणि क्रांतिकारक विचार मांडले. ते महान शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ होते.

डॉ. पंजाबराव देशमुख हे प्रागतिक विचारांचे होते. अस्पृश्यता, वर्णव्यवस्था त्यांना मान्य नव्हती. मोर्शी या ठिकाणी झालेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनात त्यांनी वर्णव्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. जातीभेद नष्ट करून एकत्र आलो तरच आपण खरे हिंदू आहोत असे त्यांचे मत होते. मुळातच ते संस्कृत भाषेचे विद्वान होते. ते वेदवाङ्मयाचे अभ्यासक होते. त्यामुळे ते प्रमाणाशिवाय बोलत नसत. अमरावतीचे अंबादेवीचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करावे, यासाठी त्यांनी चळवळ उभारली व संघर्ष केला. विश्वस्तांना विश्वासात घेऊन समतेचे महत्त्व पटवून दिले.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सोनार समाजातील विमल वैद्य यांच्याशी विवाह केला. ते जातीभेदाच्या विरुद्ध होते. डॉ. पंजाबराव देशमुख हे केवळ बोलके नव्हे, तर कर्ते सुधारक होते. सुमारे नव्वद वर्षापूर्वी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी घेतलेला हा निर्णय खूप क्रांतिकारक आणि दिशादर्शक आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख हे अमरावती कौन्सिलचे अध्यक्ष होते. सर मॉंटेग्यू बटलर मंत्रिमंडळात विविध खात्याचे मंत्री होते. मध्यप्रदेश प्रांतिक मंडळावर ते सदस्य होते. देवास संस्थानात ते मंत्री होते. अमरावती जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. नागपूर विद्यापीठाचे ते सदस्य होते. त्यांनी अखिल भारतीय अविकसित समाज घटक या संस्थेची स्थापना केली. आंतरराष्ट्रीय ग्रामीण युवक परिषदेचे ते अध्यक्ष होते. कैरो येथे झालेल्या परिषदेसाठी ते भारताचे प्रतिनिधी होते.

डॉ. पंजाबराव देशमुख हे नामवंत कायदेपंडित होते. ते लंडन येथील बॅरिस्टर होते. मायदेशी आल्यानंतर त्यांनी देशाचे दुश्मन हा खटला देखील चालविला. पुढे त्यांनी आजाद हिंद फौजेचा देखील खटला चालविला. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी त्यांनी खूप मोलाचे योगदान दिले. ते महान राष्ट्रभक्त होते, पण त्यांची राष्ट्रभक्ती प्रागतिक विचारांची होती. जातीभेद नष्ट झाला पाहिजे, आपल्या देशातील कष्टकरी, कामकरी, शेतकरी, महिला, उपेक्षित वर्ग यांचा विकास म्हणजेच राष्ट्रीय विकास हा त्यांचा राष्ट्रवाद होता. त्यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी अत्यंत मैत्रीचे संबंध होते.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भारतीय कृषी क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे. ते स्वतंत्र भारताचे नेहरू मंत्रिमंडळातील पहिले कृषिमंत्री होते. सुरुवातीच्या काळात त्यांनी वऱ्हाड शेतकरी संघाची स्थापना केली. शेतीला जोडधंदा असल्याशिवाय शेतकऱ्यांची प्रगती होणार नाही हा पंजाबराव देशमुख यांचा विचार होता. त्यासाठी त्यांनी अखिल भारतीय मधुमक्षिका पालन संघटनेची स्थापना केली. त्यांनी आंतरराष्ट्रीय धान्य मंडळाची स्थापना केली. राष्ट्रीय स्तरावरती शेतकऱ्यांचे संघटन असावे, यासाठी त्यांनी अखिल भारतीय कृषक समाजाची स्थापना केली. तरुणांना शेतीच्या क्षेत्रात दिशादर्शक शेतकरी हिताचे काम करता यावे यासाठी त्यांनी तरुण कृषक संघटनेची स्थापना केली.

डॉ. पंजाबराव देशमुख हे आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषदेचे अध्यक्ष होते. भारतीय कृषी यंत्रसामुग्री या संघटनेचे ते संस्थापक अध्यक्ष होते. अखिल भारतीय ताड गूळ महासभा या संघटनेचे ते संस्थापक अध्यक्ष होते. ते राष्ट्रीय कृषी विषयक सहकार खरेदी-विक्री संघाचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांनी भारतीय कृषक सहकार अधिकोषाची स्थापना केली. भारतीय कृषी क्षेत्रात आधुनिकिकरण करण्यासाठी त्यांनी भारतीय कृषीशास्त्र परिषदेची स्थापना केली. शेतीचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी जपान, रशिया, न्युझीलँड इत्यादी देशांना भेटी दिल्या. त्यांनी १९६० साली दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कार्य आंतरराष्ट्रीय स्तरावरील आहे. भारतीय कृषी, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात त्यांनी क्रांतिकारक कार्य केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन नागपूर विद्यापीठाने त्यांना एल.एल.डी. ही पदवी प्रदान केली. अशा महान कर्तृत्ववान, विद्वान महामानावाचा १० एप्रिल १९६५ रोजी मृत्यू झाला. आज त्यांची जयंती आहे. जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन! **


# मी कधी कंटाळतो?

**निलेश साठे**

मी कधी कंटाळतो. मी तर कधी कंटाळतच नाही. मी नेहमी उत्साही आणि एनर्जेटिक असतो. मला कधीच कंटाळा येत नाही. ज्या कामाचे मला पैसे मिळतात त्या कामाचा मला कधीच कंटाळा येत नाही. मी माझे प्रत्येक काम उत्साहाने करतो. ज्या दिवशी मला माझ्या कामाचा कंटाळा येईल आळस वाटू लागेल, त्या दिवशी मी त्या कामास पात्र नाही असे समजून त्या कामातून माघार घेईल आणि ते काम कायमचे सोडून देईन. मला माझ्या कामाचा कंटाळा येतच नाही. असे मी मी म्हणणारे कितीतरी जण आपल्या कामांमध्ये आळस आणि कंटाळा करतात, चिडचिड करतात, काम जीवावर आल्यासारखे करतात.

माणूस कामाने कंटाळत नाही. कामाने थकत नाही. तो थकतो, त्याची चिडचिड होते, ती बाह्य परिस्थितीने. परिस्थितीने माणूस गंजतो. मुले ऐकत नाहीत म्हणून वडिलांची चिडचिड होते. बायको किरकिरी असेल तरी माणूस वैतागून जातो. कामावर काही तुझे-माझे झाले तरी माणसाची चिडचिड होते. मग घरचे टेन्शन कामांमध्ये आणि कामाचे टेन्शन घरी.

त्यामुळे माणूस अगदी वैतागून जातो. कामावर गेलात की काम ावरचं होऊन जायचं. घरी आला की घरचं होऊन जायचं. हे इतकं सोपं आहे. पण, माणूस आहे, मनात चाललेली घुसमट सहजासहजी संपत नाही. ती सतत डोक्यामध्ये भिरभिरत असते. पण,



यातूनही वाचण्याचे कितीतरी मार्ग आहेत. थोडसं हलकं फुलकं व्हावं लागेल. 'लाईफ आहे चलता है यार' असं म्हणून काही गोष्टी सोडाव्या लागतील. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, छंद जोपासावे लागतील. म्हणतात ना, रिकामं डोकं म्हणजे सैतानाचे घर. सतत कार्यरत राहावं लागेल. दुःखांचं मूळ कारण पैसा आहे. पैसा वाढवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे. उत्पन्नाचे अनेक मार्ग निर्माण केले पाहिजेत. एखाद्या ठिकाणी अपमान झाला तर त्या अपमानाचा बदल लढाई झगडा करून नव्हे तर, स्वतःची आर्थिक परिस्थिती बदलून बदला घ्यायचा असतो. लढाई झगडा करून केवळ नुकसानच झालं आहे हा इतिहास आहे. काहीतरी मोठं ध्येय उराशी बाळगलं पाहिजे. ध्येय मोठं असेल तर किरकोळ घटनांकडे लक्ष देण्यास वेळ नाही मिळत. द्वेष, मत्सर, तिरस्कार करणारे लोकं ही आपल्या अवतीभवती हवीत, कारण त्यांच्यामुळेच आपल्यातल्या चुका आपल्याला दिसतात. आणि आपल्या प्रगतीचे मार्ग आपल्याला दिसू लागतात. म्हणून सतत कार्यरत राहणे. मी आत्महत्या करू शकतो इतकी कारणे माझ्यासोबतही आहेत. पण, मी आत्महत्या करणार नाही. मी नाही स्वतःची हत्या करणार. मी देवाला आव्हान देणार. तू ये मला न्यायला. तू जेव्हा येशील मला न्यायला, तेव्हा मी शानने येईल तुझ्यासोबत. असं म्हणत मस्त मजेत जगायचं. 'जिंदगी का क्या है यार जिंदगी तो बेवफा है एक दिन ठुकरायेगी. मौत मेहबूबा है अपनी ये साथ लेकर जायेगी. मृत्यूवर प्रेम करायचं. ये कधी पण ये. आत्ता आलास तरी चालेल. चल मी सोबत यायला तयारच आहे.' असं म्हणत मस्त जगायचं. कशाचं टेन्शन नाही घ्यायचं. तसं पण आपलं स्वतःचं काय आहे? आलो नागडे, नागडंच जाणार. माझं-माझं करत खूप ओझं डोक्यावर नाही घ्यायचं. हा पण माणूस म्हणून आलो आहे तर काहीतरी अस्तित्व या जगात निर्माण करायचं. रडत कुडत आयुष्य नाही काढायचं. काहीतरी करून दाखवायचं अन् मगच निघायचं. टेन्शन नही लेनेका. मोका मिळाला आहे काहीतरी करून दाखवायचा. मग कशाला मागे पडायचं. सतत काहीतरी करायचं. आळस येऊ द्यायचा नाही. कुठल्याही कामात कंटाळा येऊ द्यायचा नाही. आनंदाने, उत्साहाने केलेलीच कामे तडीस गेली आहेत. मी कधी कंटाळतो, मी तर कधी कंटाळतच नाही. असं म्हणत पुढचं पाऊल टाकायचं. **

## स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लृप्त्या व युक्त्या

# भागीदारी



आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५

भागीदारी हा व्यवसायाचा एक प्रकार आहे जो दोन किंवा अधिक व्यक्तींना सहमालक बनविण्यास सक्षम करते आणि ते व्यवसायातील नफा आणि तोटा सामायिक करण्यास सहमती देतात, अशा व्यवसायातील प्रत्येक सदस्याला भागीदार म्हटले जाते. आणि एकत्रितपणे ते भागीदारी व्यवसाय म्हणून ओळखले जाते. भागीदारीतील प्रत्येक मालक व्यवसायाच्या कल्याणासाठी काहीतरी योगदान देतो हे योगदान कल्पना (Idea) मालमत्ता, पैसा आणि कधी कधी या सर्वांच्या संयोजनाच्या स्वरुपात असू शकतात.

सोप्या भाषेत सांगावयाचे झाल्यास भागीदारी म्हणजे दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र येऊन एखादा नवीन धंदा अथवा जोडधंदा सुरु करणे होय. यात प्रत्येक व्यक्ती समान कालावधीसाठी किंवा वेगवेगळ्या कालावधीसाठी समान किंवा वेगवेगळी रक्कम गुंतवीत असतो. ठराविक कालावधीच्या समाप्तीनंतर प्रत्येकाने गुंतविलेली रक्कम व गुंतवणुकीचा कालावधी यांचा विचार करून त्यास नफ्यातील वाटा दिला जातो.

**भागीदारी व्यवसायाचे गुणधर्म**

१) दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र येऊन आपले भांडवल एकत्र गुंतवणूक करून व्यापार करतात.

२) भागीदार झालेले व्यक्ती झालेला नफा तोटा यांचे समान भाग करून वाटून घेतात.

३) मुदत समान असेल तर भांडवलाच्या प्रमाणात वाटप होते.

४) एखाद्या व्यवहारात सहभागी झालेल्या व्यक्तींना भागीदार असे म्हणतात.

५) भागीदारीच्या व्यवहारात एकत्र येऊन केलेल्या व्यापारास भागीदारी असे म्हणतात.

६) व्यवसायामध्ये जेव्हा भांडवल भिन्न मुदतीसाठी गुंतवलेली असतात, तेव्हा त्या भागीदारीला मिश्र भागीदार असे म्हणतात.

७) व्यवसायामध्ये समान मुदत असते, तेव्हा भागीदारीला साधी भागीदारी असे म्हणतात.

**भागीदारीचे प्रश्न सोडविताना पुढील बाबी लक्षात ठेवाव्यात**

अ. गुंतवणुकीची मुदत सर्वांची सारखी आहेत का? सारखी नसल्यास ती स्वतंत्रपणे काढून घ्यावी.

ब. नफा हा भांडवल व मुदत यावर आधारित असतो.

क. काही कालावधी नंतर गुंतवणूक काढून घेतल्यास सुरुवातीची गुंतवणूक व तिचा कालावधी याचा गुणाकार करावा. त्यानंतर शिल्लक गुंतवणूक व त्या गुंतवणुकीचा कालावधी यांचा गुणाकार करून तो पहिल्या गुणाकारात मिळवावा. या बेरजेच्या आधारावरच नफ्यातील वाटा द्यावा.

**महत्त्वाची सूत्रे**

१) नफ्यातील वाटा= भांडवल X मुदत

२) नफ्याचे गुणोतर = भांडवलाचे गुणोत्तर X मुदतीचे गुणोत्तर

३) भांडवलाचे गुणोत्तर = नफ्याचे गुणोत्तर ÷ मुदतीचे गुणोत्तर

४) मुदतीचे गुणोत्तर = नफ्याचे गुणोत्तर ÷ भांडवलाचे गुणोत्तर

**भागीदारीचे वैशिष्ट्ये**

१) भागीदार जो व्यवसाय सुरु करण्याचा निर्णय घेतात, त्याच्यामध्ये औपचारिक परस्पर करार करावा लागतो.

२) भागीदारीमध्ये होणारा नफा किंवा तोटा भागीदारामध्ये सामाईक अथवा ठरल्याप्रमाणे वाटला जातो.

३) सामान्य भागीदारीमध्ये सर्व भागीदारांवर दायित्वे असतात.

४) कोणत्याही प्रकारे भागीदार त्यांचे स्वारस्य विद्यमान भागीदारीमधून इतरांकडे हलवू शकत नाहीत.

**भागीदारीचे प्रकार**

१) सामान्य भागीदारी :- या प्रकाराममध्ये भागीदार दैनंदिन व्यवस्थापनामध्ये निर्णय प्रक्रियेत थेट भाग घेतात, तितकेच ते दायित्वे नफा-तोटा यासाठी जबाबदार असतात.

२) मर्यादित भागीदारी :- एकापेक्षा जास्त भागीदार असतात, त्यांची जबाबदारी मर्यादित असते. मर्यादित दायित्वामुळे व्यवसायात होणारा नफा-तोटा सहन करावा लागत नाही.

३) मर्यादित दायित्व भागीदारी :- LLP मध्ये भागीदारीवरील दायित्वे मर्यादित आहेत ते फर्मच्या कोणत्याही कायदेशीर आणि आर्थिक संकटाशी जबाबदार नाहीत हा जवळपास मर्यादित भागीदारीसारखाच प्रकार आहे.

४) इच्छेनुसार भागीदारी:- अशी भागीदारी केवळ भागीदाराच्या इच्छेवर अवलंबून असते तो केव्हाही बंधन तोडू शकतो व वेगळा होऊ शकतो.

**विविध प्रकारचे भागीदार :-**

१) सक्रीय भागीदार :- दैनंदिन व्यवहाराममध्ये भाग घेतो. काहीवेळा त्याच्या जादाच्या मेहनतीचा पगार अथवा मोबदला मेहनताना घेतो.

२) सुप्त भागीदार :- सुप्त भागीदार केवळ कंपनीला भांडवल देतात. व्यवसायात उघड उघड भाग घेत नाहीत. इतरांप्रमाणे दायित्व असतात.

३) केवळ नफ्यात भागीदार :- काही भागीदार काही विशिष्ट अटीवर भाग घेतात. नफ्याच्या एका भागासाठी काम करतात नुकसानीस जबाबदार राहत नाही.

४) मर्यादित भागीदारी :- या भागीदाराची जबाबदारी त्यांच्या तिच्या गुंतवणुकीच्या बेरजेपुरती मर्यादित असते.

५) गुप्त भागीदार :- हा भागीदार व्यवसायात स्वत:ला प्रकट करू इच्छित नाही. परंतु हक्क मात्र इतर भागादारांसारखे असतात.

**भागीदारी व्यवसायाच्या सात पायऱ्या :-**

१) भागीदारी व्यवसायाचे नाव निवडणे.

२) भागीदारीच्या कृत्यांचा मसुदा तयार करणे.

३) कर्तव्य अंतिम करण्यासाठी स्वरुपित करणे.

४) कागदपत्रां सहभागीदारी व्यवसायाच्या कराराची नोंदणी.

५) नोंदणी सुरु करणे आणि पूर्ण करणे.

६) रजिस्ट्रारकडे प्रमाणित नोंदणी मिळविणे.

७) रजिस्ट्रारकडून प्रमाणपत्र मिळविणे.

**भागीदारीवर आधारित उदाहरणे**

१) एका व्यवहारात झालेला ७२०० रु. नफा ABC यांना अनुक्रमे २:३:४ या प्रमाणात वाटल्यास इ चावाटा किती रुपये ?

२) रमेश व सुरेश यांच्या भांडवलाचे गुणोत्तर ४:५ आहे व मुदतीचे गुणोत्तर ३:४ आहे तर त्यांच्या नफ्याचे गुणोत्तर किती?

३) अ व ब यांच्या नफ्याचे गुणोत्तर १:४ आहे व मुदतीचे गुणोत्तर ५:८ आहे तर त्यांच्या भांडवलाचे गुणोत्तर किती?


४) एका उद्योग धंद्यात एकूण ९०००० रु. नफा झाला तर त्याा गुंतवणूक केलेल्या अ, ब, क यांना तो ३:७:५ या प्रमाणात देण्यात आला त्यातील क चा वाटा किती रु. आहे?

५) अ, ब, क यांनी अनुक्रमे १६००, १८००, २२०० रु. एका उद्योगात गुंतवले वर्षअखेरीस त्यांना ५६००० रु. नफा झाला त्यातील ब चा वाटा किती? ६) एक कुरण १० महिन्यांसाठी भाडेतत्त्वावर घेताना संपतने राहुलच्या तिप्पट पैसे दिले. जर संपतने आपल्या १०० गायी ६ महिने तेथे चरविल्या, तर राहुल ४ महिन्यांसाठी किती गायी चरवू शकतो? ●●

# ...कळतं, पण...



जीवनातील वयाच्या सत्तरीनंतरचा काळ सुखाचा असतो, सुंदर असतो, असे ''रंगरेषा व्यंगरेषा'' या आपल्या आत्मचरित्रात मंगेश तेंडुलकर यांनी म्हटले आहे. त्याचे कारणही त्यांनी दिले आहे. त्या काळात साऱ्या सांसारिक जबाबदाऱ्या संपलेल्या असतात. मृत्यूची धास्ती संपलेली असते, असेही ते नोंदवितात. त्यामुळे मुक्त वातावरणात, आनंदाने जगणे शक्य होते. आपले छंद, आवडीनिवडी जोपासता येतात. हेच सत्तरीनंतरचे सुखमय जीवन सध्या अनुभवत आहे. सामान्यपणे रात्री अकरापूर्वी निद्राधीन झाल्याने, सकाळी सहाच्या सुमाराला खोलीतील खिडकीतून संधी प्रकाश डोकावू लागतो आणि प्रसन्न मनाने दिवसाची सुरुवात होते. सकाळचे चहापाणी आटपून खिडकीजवळच्या टेबलावर वाचत, तर कधी लिहीत बसतो. त्यापूर्वी भल्या पहाटे पक्ष्यांचे कुंजन कानी पडते. आणि मग मात्र रस्त्यावरील वाहनांचे आवाज हळूहळू वाढू लागतात. कचरा गाडी, स्कूल बस गेल्यानंतर त्याआधी कचरावेचक महिला येऊन जातात. त्यांच्या जवळच्या कचरा गोळा करण्याची मोठी झोळी आणि लोखंडी आकडा पाहून, कुत्री त्यांचा सुरक्षित अंतर राखून माग काढतात.



सकाळी नऊनंतर भंगारवाले येऊ लागतात. त्यांचे हाकारणे वेगवेगळे आणि प्रकारही भिन्न. त्यांच्या या ओरडण्यातून कोणता भंगारवाला आला, हेही सहज ओळखता येते. कचरावेचक महिला आणि भंगारवाले यांच्यावर सामान्य, सज्जन रहिवासी, रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांप्रमाणेच, नेहमीच संशय घेतात. त्याआधी भाजी आणि मासे विकणाऱ्या स्त्रियाही साद घालतात. काही भंगारवाल्यांना कधीतरी भंगार दिले की, ते प्रत्येक वेळी दिसल्यावर विचारतात, ''काही भंगार आहे का?'' आता दररोज कोणते भंगार देणार? कचरावेचक महिला आणि भंगारवाले रस्त्याभोवतीचा परिसर आणि आपल्या घरातील अडगळ स्वच्छ करण्यात निश्चितच मदत करत असतात. पण, यांच्याकडे आपले कधी लक्षच नसते. त्यांना कोणी पाणी हवे का? असेही कोणी विचारताना दिसत नाही.

काही दिवसांपूर्वी एका भंगारवाल्याच्या चारचाकी, ढकलगाडीवर व्यायामासाठी वापरले जाणारे, जुने वेटलिफ्टिंग करण्याचे साधन पाहिले आणि आश्चर्य वाटले. कोणा भूतकालीन व्यायामप्रेमी महाशयांनी, कंटाळून दररोज व्यायामाचे वेळी वजन उचलण्याऐवजी ते साधन भंगारात देऊन व्यायामापासून आपली कायमची सुटका मिळविली असावी. त्या भंगारवाल्याच्या परवानगीने त्याचा एक फोटोही घेतला. त्याचे नाव होते फिरोज. त्याची सहज चौकशी केली. तिशी ओलांडलेला फिरोज मूळ गोरखपूरचा. अन्य गाववाल्या, भंगारवाल्यांबरोबर तो कोळीवाड्यातील एका छोट्या खोलीत राहतो. सर्वजण घरीच जेवण करतात. शिक्षण फारसे नाही. त्याचे जीवन कसे असेल, असे वाटून प्रेमाने चौकशी केली. त्याला तीन मुली आणि एक मुलगा. गावाला बायको त्यांना सांभाळते. भंगारात अनेक वस्तू दिसतात; परंतु वेटलिफ्टिंगचे साधन पाहून मला अनेक गोष्टी आठवू लागल्या. बालपणी रत्नागिरीतील लक्ष्मी चौकातील, व्यायामशाळेत, शाळकरी वयात जात असे. त्या वेळच्या विविध आठवणी जाग्या झाल्या. तेव्हा आम्ही दुरून, डोळे विस्फारून, ही साधने आणि ते वापरणारे पेहलवान पाहात होतो. नमस्कार, बैठका आणि अन्य किरकोळ व्यायाम करण्यापलीकडे आमची धाव जात नव्हती. कुस्तीच्या लाल मातीच्या आखाड्यात कधी पायही ठेवला नाही. मल्लखांबाची तर भीतीच बसली होती. एकदाच सावंत गुरुजींनी वर चढवले आणि कसेबसे उतरवले होते. मात्र, शालेय जीवनातील व्यायामाचे संस्कार, ती सवय अजूनही टिकून आहे. अजूनही रोज सकाळी व्यायाम करीत असल्याने तब्येतही चांगली राहिली आहे. मात्र, आता काही प्रौढ, दररोज व्यायामाची कटकट नको म्हणून व्यायामाची साधने भंगारात देऊ लागले आहेत. अर्थात, काही असेही म्हणतील त्यांनी आता परंपरागत, जुनी व्यायाम साधने वापरण्याऐवजी नवीन काही व्यायाम साधने वापरण्यास सुरुवात केली असावी किंवा घरच्याऐवजी जिमला प्राधान्य दिले असावे. ग्लोबल हेल्थ अहवाल सांगतो की, भारतात नियमित व्यायाम करणाऱ्या प्रौढांची संख्या निम्मी आहे. शारीरिक पातळीवर सक्रिय नसल्याने रक्तदाब, अपचन, स्थूलत्व, मधुमेह, हृदयविकार हे जीवनशैलीशी निगडित आजार झपाट्याने वाढत आहेत आणि तरुणांमध्येही वाढत आहेत. बैठी जीवनशैली, कामाचे दीर्घतास, उशिरा झोपणे, बाहेरचे निकस पण चटकदार जंक फूड, मोबाईलचा वाढता वापर, वाढते वाहनसौख्य आणि वाढती व्यसनाधीनता यामुळे हे आजार एखाद्या साथीच्या आजाराप्रमाणे वाढत आहेत. मानसिक आजारही त्यामुळे वाढत आहेत. विविध प्रसारमाध्यमांतून यावर उपयुक्त माहिती उपलब्ध असते, परंतु प्रसारमाध्यमांचा अतिरेकी वापर करणाऱ्यांना ही माहिती दिसतच नाही! ''कळतं पण वळत नाही'' हे म्हणण्याऐवजी कळतं तर वळलच पाहिजे, असे म्हणणे गरजेचे नाही का? तुम्हाला काय वाटते? **

मुक्तांगण
प्रा.शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

# साडे सातची एस.टी...



धनंजय शेटये

गोळवण गाव म्हटलं तर प्रगतशील गाव. शैक्षणिक वारसा जपणारा, सांस्कृतिक, कलाप्रेमी , राजकिय ,क्रीडा अशा सर्वच स्थरावर आपला वेगळाच ठसा उमटवला गेला आहे. गोळवण गावची फार पुर्वीपासुन संपर्क वाहिनी ठरावी अशी एक गोष्ट होती. ती म्हणजे महाराष्ट्र परिवहन महामंडळाची एस.टी.बस होय. कित्येक वर्षांपासून पासुन सकाळी साडेसात वाजता ही लालपरी अगदी दिमाखात गोळवण गावाच्या जांभळीची घाटी वेशीतुन रमतगमत आगमन करायची. अगदी सकाळी सकाळी पहिल्या गाडीने बाजाराला, रेशनिंग आणण्यासाठी जाणा-या प्रवाशांसोबतच शालेय विद्यार्थी, कॉलेज युवती-युवकांसाठी ही बस अत्यंत महत्वाचे कार्य पार पाडत आहे. अविरत सेवा देत आहे. दिमाखात ऐटदार तिचं आगमन व्हायचं. गोळवण गावच्या प्रवेश वेशीचा पहिला एस.टी. बस थांबा म्हणजे जांभळीची घाटी बस स्टॉप होय. त्यापूर्वीच्या स्थानकापासून म्हणजे पालव मांगर या क्षेत्रात बस आली की तिचा आवाज गोळवण जांभळीची घाटी बस स्टाप वर ऐकू यायचा.प्रवासी सावध व्हायचे. काजूची मोटली, घुल, कोकम, पोह्याचे भात, शेवग्याच्या शेंगा, फणस, नारळ अशा स्थानिक शेतकी उत्पादनाची विक्री करण्यासाठी शेतकरी बांधव या बसच्या प्रतिक्षेत उभे असायचे.

बस मालवण आगारातुन सकाळी सुटायची. गाडीच्या नावाच्या बोर्डवर बारीक बारीक अक्षरात बरीच नावे असायची. मला वाटतं एवढी नाव आणि एवढे गाव फिरून येणारी ही एकमेव बस असावी की काय असा त्यावेळी प्रश्न पडायचा?? खटारा झालेली गाडी असायची. अनेक वेळा पंक्चर, ब्रेक डाऊन अशा कारणांमुळे प्रवाशांचा खोळंबा उडायचा. तात्पुरता राग यायचा परंतु नंतर ही लालपरी न त्रास देता पुन्हा आपल्या ड्युटीवर रुजू व्हायची. ही बस कधी विसावा घेत नाही कधी आराम करीत नाही तांत्रिक, यांत्रिक आजारपणात तेवढी थांबायची पुन्हा ती दिमाखात आपल्या कर्तृत्व्यासाठी तत्पर व्हायची. आजही या बसने प्रवाशांची साथ सोडलेली नाही आज जवळ जवळ प्रत्येक घरात बाईक, स्कूटर, सायकल पोहोचली आहे तसेच रिक्षांचा खाजगी वाहनांचा अतिरेक झाला असला तरीही ही लालपरी आपल्या परीने आपले कार्य पार पाडत आहे. सामान्य माणसाला प्रवासात खिशाला परवडणारी जीवन संगिनी आहे.

बाजाराचा दिवस म्हणजे या साडेसातच्या बसचा तोरा काय विचारायलाच नको!! आमदार खासदार जसे भाषणाच्या ठिकाणी उशीरा हजेरी लावतात तशी ही काहीशी उशीराच येते. परंतु सर्वच प्रवाशांना घेऊन ती आनंदात वाटचाल करते. बाजाराच्या दिवशी प्रवासी बस समोरुन येताना दिसली की आधीच चेंगराचेंगरीला सुरुवात करताना दिसायची. बस थांबल्यावर शिवरायांच्या मावळयांप्रमाणे 'हर हर महादेव' करुन तुटुन पडायचे. एका रांगेत बसमध्ये चढण्याएवढं धैर्य माणसांमध्ये पाहायला मिळत नसे. पहिला प्रवासी गाडीत चढायला पहिली पाच ते सहा मिनिटं जायची.

बसमध्ये चढल्यानंतर सीटच्या मागे 'बॉटल ग्रीन' रंगावर चार आणे किंवा आठ आणे या नाण्याचा वापर करुन काही सदाउपाशी प्रेमी असणारे कॉलेजकुमार आपल्या प्रेमभावना व्यक्त करण्याचा जणू प्रेमफलक समजून पिंपळाच्या पानाचा आकार काढुन त्या मध्ये बाण काढायचे आणि आतमध्ये अक्षरं असं काहीतरी लिहुन ठेवायचे. अर्थात या गोष्टीतुन त्या प्रेमीपर्यंत भावना पोहचणं शक्यचं नाही. सदा उपाशी प्रेमीमंडळ सदस्य ह्या गोष्टींच्या माध्यमातून आपल्या मनातील अतृप्त इच्छा प्रकट करण्याचा केविलवाणा प्रयत्न करताना दिसतात. बस ही 'आपली' आहे यापेक्षा 'माझी' आहे ही भावना मनापासून असायला हवी. कारण ज्यावेळी आपण 'माझी' गोष्ट म्हणत असतो तिथे आत्मियतेने काळजी घेतो. जसे 'माझं घर' स्वच्छ ठेवतो.'आपली सोसायटी' थोडसं दुर्लक्ष करतो. कारण तिथे हा विचार की, इथे काळजी घ्यायला बरेचजण आहेत. पण तिथेच दुर्लक्ष होत असतं. आपण खरचं आपल्या सार्वजनिक संपत्तीचे देशाच्या संपत्तीचे जतन केले पाहीजे. ही जाणीव प्रत्येक मनात रुजली पाहीजे. परंतु ही गोष्ट लोकांच्या मनात उतरवायला बराच वेळ लागेल. किंबहुना काही लोक या बाबत बधीर विचारसरणीचे झाले आहेत. शासनाकडून सौरऊर्जा स्ट्रीट लाईट दिवे दिले होते. जवळ जवळ प्रत्येक वाडी वाडीवर याचे वितरण झाले होते. काही दिवस खरचं रात्रीच्या दिव्यांच्या प्रकाशात गाव उजाळुन निघालं होतं. पण काही दिवसातच एका रात्रीतच दिव्याच्या बॅटरींची चोरी झाल्याची बातमी ऐकून थक्क झालो. सी.सी.टी.व्ही. फुटेज पेक्षा माणसांचा प्रामाणिकपणाचा कॅमेरा ऑन असेल तर सर्वच रेकॉर्ड होऊ शकले असते. पण अलिकडच्या काळात काही लोकांचा प्रामाणिकपणा हरवत चालला आहे.

लाल परीच्या महान कार्याला खरचं मनापासून सलाम करावासा वाटतो. सण असो उत्सव असो ऊन, वारा, पाऊस वादळ काहीही असो ही लाल परी न विसावा घेता अविरत आपले कार्य पार पाडत आहे. पोईप -कट्टा या नावाने परिचित असणारी ही गोळवण गावाची 'लाईफ लाईन' शैक्षणिक क्षेत्रातही हिच्या सहकार्याचा अत्यंत मोलाचा वाटा आहे.

ऐन परीक्षा काळातही अगदी वेळीच नेऊन सोडणारी ही साडेसातची पोईप-गोळवण-कट्टा बस अविस्मरणीय राहील. आपलेपणाची जाणीव करुन 'आपली' म्हणण्यापेक्षा 'माझी' बस म्हणण्याइतपत मदत करणारी आहे. खरंच तिच कार्य कधीच विसरता येण्यासारखं नाही. आज प्रत्येकाजवळ खाजगी वाहन असेल त्यामुळे तिच्या योगदानाबद्दल महत्त्व वाटत नसेल. पण माझ्या दृष्टीने मात्र तिचे कार्य महानच आहे. अगदी मनापासून सलाम.**

# कोकण प्रदेशातील ऊर्जा व्यवस्थापन आणि हरित उद्योग तंत्रज्ञान



सरफराज परदेशी

आपल्याला माहिती आहे की, आपला कोकण समृद्ध परिसंस्था, जंगले आणि नद्यांसाठी प्रसिद्ध आहे. मात्र, अजूनही अनेक कंपन्यांची वीज कोळसा किंवा गॅसवर आधारित आहे. त्यामुळे पुढच्या पिढ्यांसाठी कोकणच्या परिसंस्थेचे संवर्धन करण्यासाठी हरित ऊर्जेचा अवलंब अत्यावश्यक आहे. ऊर्जा व्यव्यस्थापन आणि हरित उद्योग तंत्रज्ञानासाठी कोकणात विशिष्ट संधी आणि आव्हाने आहेत. हरित ऊर्जेचा अवलंब करून आणि ऊर्जा कार्यक्षमतेत सुधारणा करून कोकणातील उद्योग पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी कसा करू शकतात, याचे संक्षिप्त मार्गदर्शन येथे दिले आहे.

**१. सध्याच्या ऊर्जा वापराचे मूल्यांकन ऊर्जा लेखापरीक्षण :** उद्योगांसाठी सखोल ऊर्जा लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे जेणेकरून जास्त ऊर्जा वापराचे आणि वाया जाण्याचे क्षेत्र ओळखता येईल. बेसलाईन डेटा : ऊर्जा बचत आणि पुनर्निर्मानीय ऊर्जेचा समावेश करण्यासाठी ऊर्जा स्त्रोतांवर आणि वापर नमुन्यांवर डेटा गोळा करणे.

**२. पुनर्निर्मानीय ऊर्जेचा अवलंब :** भारत पुनर्निर्माणीय ऊर्जेकडे झुकत आहे आणि यामुळे संपूर्ण आद्योगिक क्षेत्रात परिवर्तन होत आहे. खालील काही उपक्रम आणि ढेंड आहेत जे एमआयडीसीमधील उद्योगांनी स्वीकारले पाहिजेत.

**सौर ऊर्जेचा अवलंब :** अनेक उद्योग ग्रीडवरील विजेवर अवलंबित्व कमी करण्यासाठी छतावर सौर पॅनेल स्थापित करत आहेत. यामुळे ऊर्जा खर्च कमी होतो आणि कार्बन फूटप्रिंट कमी होते. सरकारच्या प्रोत्साहनामुळे हा संक्रमण सोपा झाला आहे.

**पवन ऊर्जा प्रकल्प :** अनुकूल पवन परिस्थिती असलेल्या प्रदेशात कंपन्या पवन ऊर्जा प्रकल्पामध्ये गुंतवणूक करत आहेत. हे तामिळनाडू आणि गुजरातमध्ये विशेषत: यशस्वी झाले आणि आता हे इतर औद्योगिक प्रदेशांमध्येही विस्तारत आहे. हरित इमारत मानके: नवीन औद्योगिक इमारत हरित इमारत मानकांचे पालन करत बनवल्या जात आहेत. यामध्ये ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजना, उत्तम इन्सुलेशन आणि शाश्वत साहित्यांचा वापर समाविष्ट आहे. ज्यामुळे ऊर्जा वापर कमी होतो.

**वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प :** काही उद्योग वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प उभारून औद्योगिक कचरा उपयुक्त ऊर्जेमध्ये बदलत आहेत. हे कचरा व्यवस्थापनास मदत करते आणि ऊर्जा निर्माण करण्यास मदत करते. काही उद्योग हे एमआयडीसीत लागू करू शकतात.

**सहकार्याचे उपक्रम :** औद्योगिक क्लस्टर अनेकदा एकत्र येऊन हरित ऊर्जा प्रकल्प निर्माण करतात. संसाधनांचे संकलन करून ते मोठ्या प्रकल्पांना जसे सौर उद्याने किंवा पवन ऊर्जा शेत उभारू शकतात, जे स्वतंत्र कंपन्यांसाठी शक्य नसते. पुनर्निर्मानीय ऊर्जेकडे संक्रमण केवळ नियमांचे पालन किंवा खर्च बचत यापुरतेच मर्यादित नाही; जागतिक बाजारात स्पर्धेत टिकण्यासाठीही हे आवश्यक आहे. कोकणातील एमआयडीसीमधील उद्योग आणि इतर औद्योगिक क्षेत्रांनी हे ट्रेंड स्वीकारल्यास दीर्घकालीन फायदे आणि स्वच्छ पर्यावरण मिळू शकते.

**३. ऊर्जा कार्यक्षमतेत सुधारणा स्मार्ट तंत्रज्ञान :** स्मार्ट मीटर्स आणि IT (Internet of Things), AI (Artificial Intelligence) आधारित उपकरणे वापरून वास्तविक वेळेत ऊर्जा वापराचे निरीक्षण आणि अनुकूलन करणे. ऊर्जा कार्यक्षम उपकरणे: ऊर्जा कार्यक्षम उपकरणे आणि प्रक्रिया स्वीकारून ऊर्जा वापर कमी करणे.

**४. पाणी आणि कचरा व्यवस्थापन रीसायकल आणि पुनर्वापर :** पाणी आणि साहित्याचे पुनर्वापर करण्याच्या प्रणाली निर्माण करून कचरा कमी करणे आणि कार्बन फुप्रीट कमी करणे.

**उत्सर्जन उपचार प्रकल्प:** औद्योगिक कचरा नदीच्या पाण्यास किंवा परिसंस्थेला हानी पोहोचवू नये म्हणून उत्सर्जन उपचार प्रकल्पात गुंतवणूक करणे. एमआयडीसीमधील सामूहिक उत्सर्जन उपचार प्रकल्पांचा कार्यक्षम वापर करण्यालादेखील महत्त्व आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांचे पूर्ण पालन करणे.

**५. शाश्वत प्रथा पर्यावरणपूरक सामुग्री :** उत्पादन प्रक्रियेत शाश्वत साहित्यांचा वापर प्रोत्साहित करणे जेणेकरून पर्यावरणावर होणार परिणाम कमी होईल. हरित प्रमाणपत्रे : उद्योगांनी हरित प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी प्रोत्साहन देणे, जे बाजारपेठेत त्यांचे स्थान वाढवू शकते आणि पर्यावरण -जागरूक ग्राहकांना आकर्षित करू शकते.

**६. समुदाय सहभाग आणि शिक्षण जागरूकता मोहीम :** स्थानिक समुदाय आणि उद्योगांना हरित तंत्रज्ञान आणि ऊर्जा व्यवस्थापनाचे फायदे समजावून सांगण्यासाठी कार्यक्रम राबवणे. **सहकार्य :** उद्योग, स्थानिक सरकारी आणि एनजीओमध्ये भागीदारी प्रोत्साहित करणे जेणेकरून शाश्वत प्रथा आणि तंत्रज्ञान प्रचारले जाऊ शकते.

**७. सरकारी धोरणे आणि समर्थन हरित तंत्रज्ञानासाठी प्रोत्साहन :** उद्योगांनी अशा सहकारी धोरणांसाठी वकिली करणे, जे पुनर्निर्माणीय ऊर्जा आणि शाश्वत प्रथा स्वीकारणाऱ्या उद्योगांना अनुदान किंवा कर प्रोत्साहन देतात. **संशोधन आणि विकासाला समर्थन :** कंपन्यांनी स्थानिक पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेला साजेशी नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी संशोधनात गुंतवणूक प्रोत्साहित करावी.

**सरकारी समर्थन :** भारतीय सरकारी पुनर्निर्माणीय ऊर्जा प्रकल्पांसाठी कर लाभ, अनुदान आणि कमी व्याजदराने कर्ज देण्यासह विविध प्रोत्साहने देत. यामुळे उद्योगांना पुनर्निर्माणीय ऊर्जा प्रकल्पात गुंतवणूक करणे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. निष्कर्ष कोकण प्रदेशात ऊर्जा वापराच्या अनुकूलतेसाठी शाश्वत प्रथांचा अवलंब आणि हरित ऊर्जेकडे सुलभ संक्रमण यामुळे औद्योगिक क्रियाकलापांचा स्थानिक परिसंस्थेवर होणार नकारात्मक परिणाम लक्षणीय प्रमाणात कमी होऊ शकतो. पुनर्निर्माणीय स्रोतांचा उपयोग करून, ऊर्जा कार्यक्षमतेत वाढ करुन आणि समुदायाशी सहकार्य करून, कोकणातील उद्योग प्रदेशाच्या शाश्वत भविष्यामध्ये योगदान देऊ शकतात आणि कोकणच्या समृद्ध जैवविविधता आणि नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण करू शकतात. शेवटी, कोणत्याही उद्योगाने पर्यावरणीय शाश्वतता आणि ऊर्जेशी संबंधित प्रणाली स्थापित करण्याची इच्छा असल्यास मला शाश्वतता आणि ऊर्जा क्षेत्रातील औद्योगिक अनुभवाद्वारे सहकार्य करण्यात आनंद होईल. **

# नितीश रेड्डीचं पहिलं-वहिलं शतक

# अन् मेलबर्न भावनिक झालं..

## वडीलांच्या त्यागाचं आज चिज झालं




**। मेलबर्न । वृत्तसंस्था ।**

भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉक्सिंग डे कसोटी २१ वर्षांच्या नितीश कुमार रेड्डीने गाजवली आहे. या सामन्यात तिसऱ्या दिवशी नितीशने त्याचे नाणे खणखणीत वाजवले आहे. आठव्या क्रमांकावर फलंदाजीला उतरत त्याने वॉशिंग्टन सुंदरसोबत शतकी भागीदारीही केली. मात्र, त्याच्या शतकासोबतच त्याच्या वडिलांचीही चर्चा झाली. नितीशचे शतक पुर्ण होताच त्याच्या वडीलांच्या डोळ्यांत आनंदाश्रु आले होते. त्यामुळे, संपुर्ण मेलबर्न स्टेडियम भावनिक झाले होते.

बॉक्सिंग डे कसोटीतील तिसऱ्या दिवशी शनिवारी (दि.२८) भारताचे आघाडीचे फलंदाज माना टाकत असताना नितीश कुमार रेड्डीने कसोटी संघातील त्याची निवड सार्थ ठरवली आहे. तत्पूवी, ऑस्ट्रेलियाच्या ४७४ धावांचा पाठलाग करताना भारताकडून दुसऱ्या दिवशी यशस्वी जैस्वालने ८२ धावांची खेळी करत विराट कोहलीसह शतकी भागीदारी केली. परंतु, विराटही ३६ धावांवर बाद झाला, तर केएल राहुलने २४ धावा केल्या. दुसऱ्या दिवसाअखेर भारताने ५ बाद १६४ धावा केल्या होत्या. तिसऱ्या दिवशी सुरुवातीला ऋषभ पंत २८ धावांवर बाद झाला. त्यानंतर रवींद्र जडेजा आणि नितीश कुमारने डाव पुढे नेला होता. परंतु, जडेजा देखील १७ धावांवर बाद झाला. तेव्हाही भारताला फॉलोऑन टाळण्यासाठी ५४ धावांची गरज होती आणि शेवटचे ३ गडी शिल्लक होते. त्याचवेळी नितीश आणि वॉशिंग्टन सुंदर या दोघांनी मिळून आधी भारताचे फॉलोऑन टाळले आणि मग ऑस्ट्रेलियाची आघाडी कमी करण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान, दोघांमध्ये शतकी भागीदारीही झाली. या भागीदारीदरम्यान, नितीशने आधी ८१ चेंडूत अर्धशतक केले. तर, वॉशिंग्टनने १४६ चेंडूत अर्धशतक केले. दरम्यान, दोघांच्या भागीदारीमुळे भारतानेही ३४० धावांचा टप्पा सहज पूर्ण केला आणि वॉशिंग्टन ५० धावांवर बाद झाला. लगेचच जसप्रीत बुमराही बाद झाला. त्यानंतर मोहम्मद सिराजला साथीला घेत नितीशने शतक पूर्ण केले. नितीशने (१०५) १७१ चेंडूत त्याचे शतक पूर्ण केले. हे नितीशचे पहिलेच आंतरराष्ट्रीय शतक आहे. त्याने ही शतकी खेळी करताना या मालिकेत २५० धावांचा टप्पाही पार केला आहे. भारताने तिसऱ्या दिवस अखेर ११६ षटकांत ९ बाद ३५८ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडे ११६ धावांची आघाडी आहे.

### वडीलांच्या डोळ्यात आनंदाश्रु

नितीश जेव्हा शतकाच्या जवळ होता, तेव्हा त्याचे वडील प्रार्थना करताना दिसत होते आणि त्याने शतक पूर्ण करताच त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रु होते. कारण नितीशने इथपर्यंत पोहचण्यात त्याच्या वडिलांचा मोठा वाटा आहे. विशाखापट्टणममध्ये त्याचे नोकरी करत होते. २०१२ दरम्यान, त्यांची बदली राजस्थानला होणार होती. परंतु, नितीशच्या क्रिकेटसाठी त्यांनी ही बदली नाकारली आणि नोकरी सोडली आणि नितीशच्या क्रिकेटसाठी योगदान दिले. नितीश तिथे एमएसके प्रसाद यांच्या अकादमीत प्रशिक्षण घेत होता. नितीशनेही आई-वडिलांचे कष्ट पाहिले आणि क्रिकेटमध्ये प्रगती केली.

नितीश त्याच्या कहाणीबद्दल सांगतो की, सुरुवातील मी खूप गंभीर नव्हतो. परंतु, माझ्या वडिलांनी नोकरी सोडली. माझ्या कहाणीमागे खूप त्याग आहेत. एक दिवस मी वडिलांना आर्थिक अडचणीमुळे रडताना पाहिले आणि मग ठरवले की मी असे करून चालणार नाही, मला गंभीरतेने क्रिकेट खेळावे लागेल. मी माझी पहिली जर्सीही त्यांना दिली आहे आणि त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहिला आहे.

### क्रिकेटमधील पदार्पण

नितीश कुमार रेड्डीने २०20 मध्ये आंध्र प्रदेशकडून प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्यानंतर त्याने २०21 मध्ये प्रथम श्रेणी आणि टी-२० क्रिकेटमध्येही पदार्पण केले. त्याचा खेळपाहून सनरायझर्स हैदराबादनेही त्याच्यावर विश्वास दाखवला आणि त्याला २०२३ मध्ये संघात स्थान दिले. २०२४ मध्ये नितीशने त्याच्या खेळाने सर्वांनाच प्रभावित केले. त्याला २०२४ मध्ये लगेचच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही पदार्पणाचीही संधी मिळाली. त्याने बांगलादेशविरुद्ध ग्वाल्हेरमध्ये टी-२० सामन्यातून भारतासाठी पदार्पण केले. त्यानंतर त्याची निवड ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठीही झाली आणि पहिल्या सामन्यापासूनच नितीशने त्याची प्रतिभा दाखवली.

---

## टॉपवर्थच्या विद्यार्थ्यांचे नृत्य सादरीकरण

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

पाली येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या टॉपवर्थ इंग्रजी माध्यम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी (दि.२७) मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात छोटा शिशु, मोठा शिशु व इयत्ता पहिले ते नववीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकाराचे नृत्य सादर केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यांनी उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.




या कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिकांच्या भाषणाने झाली. तसेच, शाळेतील शिक्षिकांनी आपल्या भाषणात मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर अनेक मान्यवरांनी देखील भाषण केले. दरम्यान, उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त करत त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी पालक, शिक्षक आणि इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे भरभरून कौतुक केले. या स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला असून त्यांचा आत्मविश्वास देखील वाढला असल्याचे शाळेच्या शिक्षकांकडून बोलले जात आहे.

## कबड्डी सराव शिबिराला सुरुवात

**। पुणे । प्रतिनिधी ।**

भारतीय हौशी कबड्डी फेडरेशनच्या मान्यतेने (हरिद्वार) उत्तराखंड येथे संपन्न होणाऱ्या ३८वे राष्ट्रीय खेळ कबड्डी स्पर्धेकरीता महाराष्ट्र राज्याचा पुरुष व महिलांचा अंतिम संघ निवडण्यात येणार आहे. त्यासाठी पुण्यातील बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात २५ डिसेंबर ते ०८ जानेवारी या कालावधीत महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाच्या सराव शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या सराव शिबिरात विविध जिल्ह्यांतील एकूण २७ पुरूष व २८ महिला खेळाडूंना संधी देण्यात आलेली आहे. तसेच, महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाचे हे शिबीर राष्ट्रीय प्रशिक्षक राजेश पाडावे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. लक्षणीय बाब म्हणजे या सराव शिबिराच्या अंतिम दिवसापर्यंत आपली १००% गुणवत्ता सिद्ध करु शकणाऱ्या पुरुष व महिला गटातील गुणवत्ताधारक खेळाडूंनाच महाराष्ट्र राज्य संघात प्रामुख्याने स्थान दिले जाणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.चे सह कार्यवाहक बाबुराव चांदेरे यांनी दिली आहे. सराव शिबीर संपल्यावर महाराष्ट्राच्या पुरुष व महिलांचा कबड्डी संघ दिनांक २६ जानेवारी रोजी हरिद्वार-उत्तराखंड येथे ३८व्या राष्ट्रीय क्रीडा खेळातील कबड्डी स्पर्धेकरीता रवाना होणार आहे.

## टीआयपीएल रोटरी प्रीमियर लीगचे आयोजन

**। पनवेल । वार्ताहर ।**

टीआयपीएल रोटरी प्रीमियर लीग ही क्रिकेट प्रेमी रोटरी सदस्यांसाठी पनवेल परिसरात आयोजित करण्यात येणारी क्रिकेट स्पर्धा आहे. ही स्पर्धा १० ते १२ व १७ ते १९ जानेवारी या कालावधीत खेळवली जाणार आहे. रायगड रोटरी वरियर्स हे या स्पर्धेचे आयोजक असून या स्पर्धेत रोटरी ३१३१ प्रांतातील ४० वर्षांवरील ७८ रोटरी सदस्य खेळाडू म्हणून सहभागी झाले आहेत. त्यांची ६ विविध संघात प्रत्येकी १३ खेळाडूंचा लिलाव (पैश्यांच्या ऐवजी पॉईंट्स) पद्धतीने निवडले जातात.

## जिल्हाप्रमुखपदी संतोष कवळे यांची निवड

**। अलिबाग । वार्ताहर ।**



कराटे या क्रीडा प्रकाराचा राज्यभर प्रचार व प्रसार करण्यासाठी युवा कार्यक्रम तसेच खेल मंत्रालय भारत सरकारशी संलग्न असणाऱ्या स्टेअर्स फाउंडेशनच्या रायगड जिल्हा प्रमुखपदी कराटे प्रशिक्षक संतोष कवळे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे टूर्नामेंट टेक्निकल डायरेक्टर गणेश मंगल गिरी, तसेच कराटे प्रमुख विशाल जाधव, महाराष्ट्र राज्याचे स्पर्धा समिती चेअरमन राजकपूर बागडी यांच्याद्वारे करण्यात आली.

संतोषकवळेयांच्यास्टेअर्सच्या रायगड जिल्हाप्रमुख पदी झालेल्या निवडीमुळे जिल्ह्यातील कराटे खेळाडूंना स्टेअर्स (युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय भारत सरकार)च्या माध्यमातून जिल्हा, राज्य व राष्ट्रीय कराटे स्पर्धा खेळण्याची संधी मिळणार आहे. तसेच, मुलींना व महिलांना स्वतः चे स्वरक्षण करता यावे यासाठी जिल्ह्यात कराटे प्रशिक्षण शिबीर देखील घेतली जाणार आहेत.

---




● अलिबाग समद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांनी येथे जवळच असलेल्या क्रीडाभवन मैदानावर वाहन पार्किंग केल्याने या मैदानावर खेळणाऱ्या स्थानिक खेळाडूंचा हिरमोड झाला आहे. नगरपरिषद प्रशासन बाहेरून येणाऱ्या वाहनांकडून कर वसूली करते, त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांच्या वाहन पार्किंगची व्यवस्था देखील त्यांनी करावी, अशी मागणी खेळाडू करत आहेत. (छायाचित्र- समीर मालोदे)

## कासू ‘ब’ ठरला अंतिम विजेता

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील नागोठणे विभाग क्रिकेट असो.च्या मान्यतेने तळवली तर्फे अष्टमी आदिवासी वाडी युवक मंडळाच्यावतीने संपन्न करण्यात आलेल्या मर्यादित क्रिकेट स्पर्धेत कासू ‘ब’ हा संघ अंतिम विजेता ठरला आहे.



या स्पर्धेत एकूण १६ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेतील अंतिम सामन्यात कासू ‘ब’ संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला असून चिकणी संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले आहे. तर, पाटणसई व कासू ‘अ’ या दोन्ही संघांना अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे. विजेत्या संघांना मधुकर पवार व वसंत पवार यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तर, स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी तळवली तर्फे अष्टमी आदिवासी युवक मंडळाने मोलाचे सहकार्य केले.

## विजयी परंपरा खंडित

**पनवेल :** उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथे जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रायगड जिल्ह्यातील एकूण १६ मुलामुलींच्या संघांनी सहभाग घेतला होता. महिला खुल्यागटात मुलींच्या वायुदूत क्रीडा केंद्र कळंबोली संघाने बलाढ्य महात्मा गांधी हाशिवरे संघाचा २ गुणांनी पराभव केला. विशेष म्हणजे या संघाची १७ वर्षांची विजयाची परंपरा वायदुतने मोडीत काढली आहे. या स्पर्धेमध्ये सर्वोत्तम आक्रमण म्हणून संजीवनी जगदाळे व संरक्षक भूमी पाटिल व अष्टपैलू खेळाडू मृदुला पुकळे यांचा गौरव करण्यात आला.

---

### जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# तिसऱ्या फेरीसाठी चुरशीची लढत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई शहर कबड्डी असो. आयोजित जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिरात सुरू आहेत. या स्पर्धेत श्री गणेशकृपा, हिंद केसरी, शिवनेरी स्पोर्ट्स व आंबेवाडी यांनी पुरुष द्वितीय श्रेणी गटात तिसरी फेरी गाठली आहे. यावेळी, आठ संघांत तिसऱ्या फेरीसाठी चुरशीची लढत पाहायला मिळाली.



पुरुषांच्या पहिल्या सामन्यात श्री गणेशकृपाने पूर्वार्धातील १०-१२ अशा पिछाडीवरून अमरदीप मंडळाचा प्रतिकार २३-२१ असे मोडून काढले. श्रीकांत मोरे, आदेश जांगली यांच्या चढाई पकडीच्या संयमी खेळामुळे गणेशकृपाचा हा विजय शक्य झाला. अमरदीपच्या प्रसाद सिंह, कुणाल खारगावकर यांचा खेळ उत्तरार्धात थोडा कमी पडला. दुसऱ्या सामन्यात हिंद केसरी मंडळाने श्रीराम स्पोर्ट्सचा विरोध ३३-२९ असा संपविला. प्रणव वाडकर, रोहित तळेकर यांनी पहिल्या डावात आक्रमक खेळ करीत हिंद केसरीला २१-०९ अशी आघाडी घेतली होती. मात्र, सुर सापडलेल्या श्रीरामच्या किरण खोत, भावेश गायकर यांनी आपला खेळ गतिमान करीत हिंद केसरीचा चांगलीच टक्कर दिली. परंतु, विजयापासून ते दूरच राहिले.

तिसऱ्या सामन्यात शिवनेरी स्पोर्ट्सने ऋषीमुनी स्पोर्ट्सला २८-१९ असे नमवित आगेकूच केली. मध्यांतराला १६-१० अशी आघाडी शिवनेरीकडे होती. साहिल आवळे, दीपक मोरे शिवनेरीकडून, तर श्रेयस आंबोपकर ऋषीमुनी कडून उत्कृष्ट खेळले. चौथ्या सामन्यात आंबेवाडी मंडळाने श्री साई क्लबचा ३३-२६ असा पराभव केला. विश्रांतीला १६-१० अशी आघाडी आंबेवाडीकडे होती. विश्रांती नंतर मात्र सामन्यात रंगतदार क्षण पहावयास मिळाले. ऋषिकेश शिंदे, यश माचिवले आंबेवडीच्या विजयात चमकले. तेजस गायकवाड, वेदांत वारीसे यांनी श्री साई क्लबकडून दुसऱ्या डावात कडवी लढत दिली.

इतर निकालात महालक्ष्मी विरूद्ध गावदेवी (३४-११), वीर नेताजी विरूद्ध युवा स्पोर्ट्स (४३-२०), जय खापरेश्वर विरूद्ध श्रीमंतयोग (३४-२३).

## राजू कोळी यांना ब्लॅकबेल्ट प्रदान

**। उरण । प्रतिनिधी ।**

नुकत्याच झालेल्या ५० व्या गोशीन-रियु कराटे फेडरेशन मलेशिया आयोजीत कराटे स्पर्धा, ब्लॅकबेल्ट परिक्षा व पंच परिक्षा यांचे ११ ते १४ डिसेंबर या कालावधीत मलेशिया येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सिहान राजु गणपत कोळी यांनी मास्टर काता सोचीन व गोज्युशियोशो सादर करून परिक्षेत वयाच्या ६१ व्या वर्षी ६ डिग्री ब्लॅकबेल्ट उत्तीर्ण झाले. तसेच, त्यांनी पंच परीक्षाही पास केली आहे. त्यांचे सर्वांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच, राहुल तावडे, मतीआनंद, आनंद खारकर, कृष्णा पाटिल, भुपेंद्र माळी, रेश्मा माळी, राजेश कोळी, परेश पावसकर, अंजा माने, अमिता घरत, आमिशा घरत, भुषण म्हात्रे, अनिष पतिल, शुभम ठाकुर, विग्नेश कोळी, ॲड. नितिन मोहिते, ॲड. शितल गणेशकर, निकिता कोळी, विनय पाटील, कृषाणु कोळी, सुलभा कोळी या सर्वांच्या सहकार्यामुळे राजु कोळी यांना यश प्राप्त करता आले आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)